# मॉडर्न विद्यालयाचे ७५ वे स्नेहसंमेलन!

## अकोले तालुक्यात शिक्षणाची पायाभरणी हिंद सेवा मंडळाने केली : वैभवराव पिचड

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाने अकोले तालुक्यात मॉडर्न हायस्कूलची स्थापना पंचाहत्तर वर्षांपूर्वी करून शिक्षणाची भक्कम पायाभरणी केली. विद्यालय आणि देवालय मानवी आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे असून, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शाळेची भूमिका निर्णायक असते, असे प्रतिपादन वैभवराव पिचड यांनी केले.




ते मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, सोमचंद शहा कॉमर्स व भास्करराव कदम गुरुजी सायन्स, अकोले यांच्या ७५व्या स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर होते.

यावेळी माजी विद्यार्थी व जीएसटी विभाग, नाशिक येथील राज्यकर उपायुक्त ज्ञानदेव मुरकुटे, हिंद सेवा मंडळाचे सचिव योगेश देशमुख, कार्यकारिणी सदस्य दिलीप शहा, मॉडर्न ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन व नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, मॉडर्न हायस्कूलचे चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी, ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेच्या चेअरमन स्मिता मुंदडा, बालक मंदिरचे चेअरमन रामेश्वर रासने, हिंद सेवा पतपेढीचे व्हा. चेअरमन सतीश फरागडे, सौ. वर्षा मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते.

वैभवराव पिचड पुढे म्हणाले की, गेल्या सात दशकांहून अधिक काळ मॉडर्न विद्यालय विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देत आहे. विद्यार्थी घडविण्यात आजी–माजी शिक्षकांचे योगदान मोलाचे असून, माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांनी संस्थेला वेळोवेळी दिलेल्या मदतीची आठवण त्यांनी करून दिली.

शाळेचे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत असून, गुणवत्तेची उज्वल परंपरा भविष्यातही कायम राहावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पूर्वीची नालंदा विद्यापीठे व गुरुकुल संस्कृती काळानुरूप लोप पावल्याचेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रमेश झरकर म्हणाले की, अकोले येथील सर्व युनिट्स गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत. विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे. संपूर्ण जिल्ह्यात मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी प्रथम यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत, भविष्यात सुसज्ज इमारत उभारण्यासाठी मंडळ कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

माजी विद्यार्थी ज्ञानदेव मुरकुटे यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला.

यावेळी देणगीदार कमलताई कदम, पत्रकार दिनानिमित्त अमोल वैद्य, भाऊसाहेब वाकचौरे; तसेच जनजाती कल्याण आश्रमच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. संतोष कचरे यांचा सत्कार करण्यात आला. वर्षभरातील उल्लेखनीय कार्याबद्दल सौ. सुजाता देशमुख, संपत वाळके, रुपेश गायकर, सोनाली नवले, राम वाकचौरे यांचाही गौरव करण्यात आला.

# एस. एन. इंग्लिश मिडीयम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न!

**(समर्थ गांवकरी)**

दि. ५ जानेवारी २०२६ रोजी एस. एन. इंग्लिश मिडीयम स्कूल येथे शालेय वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेघाताई नितीन राक्षे तर प्रमुख पाहुणे म्हणून दिलीपराव मोहिते पाटील यांची उपस्थिती लाभली.

यावेळी माजी नगराध्यक्ष बापू थिगळे, मच्छिंद्र राक्षे, सतीश राक्षे, अमोल काका सांडभोर, बापू सांडभोर, विकास चव्हाण, धर्मराज पवळे व गोरक्ष राक्षे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, समूहगान आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थित मान्यवरांनी भरभरून दाद दिली.



शैक्षणिक, क्रीडा व सहशैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. शाळेच्या प्राचार्या वसुधा ढोरे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षक व पालकांच्या सहकार्याबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहसंमेलन आनंददायी व उत्साही वातावरणात संपन्न झाले.

# मुरबाड शहरातील शुद्ध पाण्याचा उपक्रम वादात

**मुरबाड शहर : (समर्थ गांवकरी)**

नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मुरबाड नगरपंचायतीने उभारलेला आरओ प्लांट सध्या चर्चेचा आणी वादाचा विषय ठरला आहे. कारण हा आरओ प्लांट थेट भारत वाईन शॉपलगत उभारण्यात आला असून, नगरपंचायतीच्या नियोजनक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शुद्ध पाणी देण्याचा हेतू स्तुत्य असला, तरी त्यासाठी निवडलेली जागा मात्र अक्षरशः "विषारी" असल्याची भावना नागरिकांमध्य चे आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे मुरबाड तालुकाध्यक्ष दीपक अशोक वाघचौडे यांनी नगरपंचायतीला लेखी निवेदन देत, सदर आरओ प्लांट किंवा भारत वाईन शॉप तात्काळ स्थलांतरित करण्याची मागणी केली आहे. या ठिकाणी




महिलावर्ग लहान मुले व Deepak Waghchaure ज्येष्ठ नागरिक पिण्याच पाणी 1.58 AN यासाठी येत असिस्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र दारूच्या दुकानालगत कायमस्वरूपी असलेला दारुड्यांचा वावर, अस्वच्छता आणि गोंधळ यामुळे महिलांना येथे येणरे असुरक्षित वाटत आहे. शुद्ध पाण्यासाठी रांग लावायची आणि बाजूलाच दारूच्या बाटल्यांचा खणखणाट ऐकायचा, हे कोणत्या सुजाण नियोजनाचे उदाहरण आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.या परिसरात धार्मिक तिर्थालये, विविध शासकीय कार्यालये, शहीद हिराजी पाटील यांचे स्मारक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असल्याने या ठिकाणचे सामाजिक आण िसांस्कृतिक पावित्र्य जपले जाणे अपेक्षित होते.

# कोंडाबाई चासकर

**अकोले: (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील बहिरवाडी येथील कोंडाबाई शंकर चासकर (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. माजी सभापती व दूधगंगा पतसंस्थेचे संस्थापक स्व. विठ्ठलराव, शांताराम, गवराम, आर्मीतील सेवानिवृत्त दशरथ व सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष चासकर, सखुबाई आंबरे यांच्या त्या मातोश्री होत. नवलेवाडी ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच व अगस्ति महाविद्यालयातील प्रा. सचिन व दूधगंगा पतसंस्थेचे चेअरमन डॉ. नितीन चासकर यांच्या त्या आजी होत.

# शालेय स्नेहसंमेलनात कला-संस्कृतीचा जागर

- ओतुर ज्युनिअर केजी ते १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

ओतूर येथील माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडले. या स्नेहसंमेलनात ज्युनिअर केजी ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, त्यामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक नाट्यप्रयोग सादर केले. लहानग्यांच्या निरागस अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली, तर मोठ्या विद्यार्थ्यांच्या सशक्त संवादांनी समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला. याशिवाय गाणी, समूहगीत, नृत्य, भाषणे आदी कार्यक्रमांनी स्नेहसंमेलनाला रंगत आणली. विशेष बाब म्हणजे विद्यार्थिनींनी विविध भाषांमध्ये सादरीकरण करून आपली कलागुणांची झलक दाखवली. मराठीसह इतर भाषांतील गीत-नाट्य व भाषणांनी बहुभाषिक संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले. विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे पालक व मान्यवरांनी विशेष कौतुक केले.या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षपद मा. श्रीमती हेमलताताई बिडकर (अध्यक्षा, डांग सेवा मंडळ, नाशिक) यांनी भूषवले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळाली. उपस्थित शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,ओतूर गावांसह परीसरातील गावांचे सर्वच सरपंच उपसरपंच सदस्य, प्रगतीशील शेतकरी,शेत मजूर,सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्ष कार्यकर्ते, पत्रकार ,शाळेचे प्राचार्य व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून आत्मविश्वास वाढीस लागला आहे, अशी भावना पालकांनी व्यक्त केली.

एकूणच, ओतूर येथील शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन हे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा स्नेहबंध अधिक दृढ करणारे आणि शिक्षणासोबत संस्कृतीची जपणूक करणारे ठरले.

# महाराष्ट्रात ५९ व्या निरंकारी संत समागमाची पूर्व तयारी उत्साहपुर्वक

- सांगलीमध्ये भक्ती आणि श्रद्धेचा एक अनोखा संगम
- पुण्यासह महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवकांची सेवा कार्यासाठी उपस्थिती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

निरंकारीसद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात महाराष्ट्राचा ५९वा वार्षिक निरंकारी संत समागम भव्यदिव्य स्वरुपात दिनांक २४,२५ व २६ जानेवारी, २०२६ रोजी सांगली ईश्वरपुर रोड, सांगलवाडी, सांगली (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित करण्यात येत आहे. कृष्णा नदीच्या रमणीय काठावर वसलेले, स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांची कर्मभूमी तसेच कला आणि सांस्कृतिक वारसाने समृद्ध असलेल्या सांगली शहराला या वर्षी प्रथमच महाराष्ट्राचा प्रादेशिक संत समागम आयोजित करण्याचा सन्मान प्राप्त झाला आहे. आध्यात्मिकतेचा आधार घेऊन या समागमामध्ये प्रेम, शांती आणि एकतेचा वैश्विक संदेश दिला जातो जो निःसंशयपणे सर्व मानवजातीच्या कल्याणार्थ आणि प्रेरणादायी असतो. या संत समागमाच्या यशस्वीतेसाठी २८ डिसेंबर २०२५ पासून विधिवत रूपात स्वेच्छा सेवाकार्याचा शुभारंभ करण्यात आला तेव्हापासूनच सांगली परिसरासह संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने निरंकारी सेवादल सदस्य, स्वयंसेवक आणि भाविक भक्त समागम स्थळावर पोहोचून भक्ती, श्रद्धा आणि निष्काम भावनेने विविध सेवांमध्ये आपले योगदान देत आहेत. निरंकारी संत समागमाची भव्यता केवळ त्याच्या व्यापक भौतिक स्वरूपापुरती मर्यादित नसून, देश-विदेशातून येणाऱ्या असंख्य श्रद्धालू भक्तांच्या निर्मळ भावना, आत्मिक आनंद आणि सामूहिक चेतनेत तिचे खरे प्रतिबिंब दिसून येते. निरंकारी संत समागम मानवतेचा असा एक दिव्य संगम असतो जिथे धर्म, जात, भाषा, प्रांत तसेच गरीब-श्रीमंत आदि भेदभावाच्या पलीकडे जाऊन सर्व मानव प्रेम, सौहार्दपूर्ण आणि समानतेच्या भावनेने सेवा, स्मरण आणि सत्संग करतात. संत समागमाच्या तयारीला मोठ्या उत्साहाने, शिस्तबद्धतेने आणि समर्पणाने वेग आलेला पाहायला मिळत आहे. एकीकडे विस्तीर्ण मैदाने सपाट केली जात आहेत, तर दुसरीकडे येणाऱ्या श्रद्धाळूच्या निवासाची ,भोजनाची, स्वच्छता गृहांची, आरोग्याची ,सुरक्षेची, आगमन-प्रस्थानाची व इतर सर्व मूलभूत सुविधांची तयारी केली जात आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून येणाऱ्या भाविकांच्या सहयोगाने सत्संग मंडप, निवासी तंबू, शामियाना आणि सर्व आवश्यक सुविधांनी सुसज्ज असलेले सुनियोजित नगरी आकार घेत असलेले पाहायला मिळत आहे.



# रक्तदानातून मानवतेचा संदेश

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

जगद्गुरू रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून श्री संप्रदायाच्या वतीने राज्यभर सुरू असलेल्या रक्तदान महाकुंभ–२०२६ अंतर्गत भोकर येथे आज, बुधवार दि. ७ जानेवारी रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तहसील कार्यालयासमोर सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे. गरीब व गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या मानवतावादी हेतूने आयोजित या शिबिरात भोकर तालुक्यातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री संप्रदाय तालुका सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सिकलसेल, थॅलेसेमिया, कॅन्सरग्रस्त, अपघातग्रस्त व शस्त्रक्रियेसाठी आवश्यक रक्तासाठी हा उपक्रम जीवनदायी ठरणार आहे.

# माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेस मान्यवरांची सदिच्छा भेट!







**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्यातील एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेचे सचिव तथा ठाणे महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक मा. श्री. रामशेठ रेपाळे, मा. श्री. देविदास दरेकर (शिवसेना जिल्हा प्रमुख, पुणे), मा. श्री. प्रकाश वाडेकर (जिल्हा उपप्रमुख, शिवसेना पुणे) यांनी राज्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य शिखर संस्था असलेल्या माळशेज नागरी सहकारी पतसंस्था मुख्यालयास सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी मान्यवरांना संस्थेच्या कार्यपद्धती, आर्थिक सेवा, सामाजिक उपक्रम व भविष्यातील वाटचालीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. संस्थेच्या प्रगतीशील कार्याबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त करत सहकार क्षेत्रातील संस्थेच्या योगदानाचे कौतुक केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे यांनी मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व संस्थेची दिनदर्शिका देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला.

सहकार चळवळ बळकट करण्यासाठी अशा सदिच्छा भेटी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.





अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित आरोग्य सेवा देणारे माझे कौटुंबिक जिव्हाळा जपणारे मित्रवर्य डॉ बाबासाहेब गोडगे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे

# चंद्रानंद कृषीपणन व समाजकल्याण संस्थेतर्फे डॉ. किशोर पाटील यांना ‘बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार २०२६’ प्रदान

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

चंद्रानंद कृषीपणन व समाजकल्याण संस्था, ठाणे जिल्हा यांच्या वतीने दै. स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांना पत्रकारितेतील त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान व समाजाभिमुख कार्याची दखल घेत ‘बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकारिता पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आला. हा सन्मान रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी कैलासनगर, वळपाडा येथील पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांच्या शुभहस्ते, मान्यवर पाहुणे व शेकडो पत्रकारांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.




या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम ₹११,१११, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे होते. हा पुरस्कार विशेष व आकर्षक असून समाजहित जपणाऱ्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा सन्मान असल्याची माहिती डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांनी दैनिक स्वराज्य तोरण व अन्य प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

डॉ. किशोर बळीराम पाटील यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात भिवंडी शहर, ग्रामीण भागासह संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, स्थानिक समस्या, शेतकरी, कष्टकरी व सामान्य माणसांचा आवाज त्यांनी सातत्याने शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

गेल्या १८ वर्षांपासून दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक म्हणून त्यांनी आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. विशेष म्हणजे आगरी समाजातून महाराष्ट्रातील एकमेव मराठी दैनिकाचे संपादक म्हणून त्यांनी समाजाला वैचारिक दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. निर्भीड लेखनशैली, सामाजिक बांधिलकी व सत्यनिष्ठ पत्रकारिता ही त्यांच्या कार्याची ठळक ओळख ठरली आहे.

तसेच पत्रकारांच्या हितासाठी नेहमीच पुढाकार घेऊन त्यांना मदतीचा हात देत योग्य सहकार्य करणारे संपादक म्हणूनही डॉ. किशोर पाटील यांची ओळख आहे. पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा हा पुरस्कार म्हणजे सत्य, निडरता व समाजहित जपणाऱ्या पत्रकारितेचा गौरव असल्याचे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

डॉ. किशोर पाटील यांची ही निवड युवा पत्रकारांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संस्थापक अध्यक्ष डॉ. श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केला. या पुरस्कार वितरण सोहळ्यामुळे स्थानिक पत्रकारिता व सामाजिक कार्याला नवी ऊर्जा मिळेल, अशी प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे.

# आबासाहेब सूर्यवंशी यांचा पुरस्काराने सन्मान!

- पत्रकार दिनानिमित्त भडगाव तालुक्यात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने विविध उपक्रम!

**पाचोरा : (समर्थ गांवकरी)**

६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त भडगाव तालुक्यात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने तालुक्यातील तांदुळवाडी येथील माध्यमिक विद्यालयात भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात पाचोरा येथील निर्भीड, निष्पक्ष व सडेतोड लेखणीतून सामाजिक, राजकीय व प्रशासकीय पातळीवर न्यायहक्कासाठी सातत्याने लिखाण करणारे, दैनिक प्रहार वृत्तपत्राचे जळगाव जिल्हा ब्युरोचीफ ज्येष्ठ पत्रकार



आबासाहेब लक्ष्मण सूर्यवंशी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार पाचोरा नगरीच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. सुनीताताई किशोर पाटील तसेच भडगाव नगरीच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. रेखाताई मालचे यांच्या हस्ते, मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

यावेळी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष किशोरभाऊ रायसाकडा, ज्येष्ठ पदाधिकारी राकेश सुतार, गौतम सोनवणे, भोला पाटील, अन्वर शेख तसेच भडगाव तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते. सर्वांनी आबासाहेब सूर्यवंशी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

तसेच या कार्यक्रमात गावातील कै. दगडु पाटील निवासी वसतिगृह येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना संघटनेच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हे वाटप संघटनेचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सुचनेनुसार उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांच्या हस्ते करण्यात आले.

याच वेळी चाळीसगाव नगरीचे ज्येष्ठ पत्रकार, दैनिक प्रहारचे तालुका प्रतिनिधी सूर्यकांतजी कदम यांना चाळीसगाव पत्रकार रत्न, पाचोरा तालुक्यातील वरखेडी–पिंपळगाव–लोहारा परिसराचे वार्ताहर अशोकभाऊ चौधरी यांना समाजरत्न, तर युवा पत्रकार म्हणून भोला पाटील यांचा सन्मान व गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम पत्रकारितेतील योगदान, सामाजिक बांधिलकी व नव्या पिढीला प्रोत्साहन देणारा ठरला.

## नवी मुंबई : कोपरखैरणे सेक्टर ५ परिसरात गटारांची दयनीय अवस्था, नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका!

**नवी मुंबई: (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर ५ परिसरात मूलभूत नागरी सुविधांचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे. कोकण अपार्टमेंट व महादेव शंकर अपार्टमेंटच्या बाजूला असलेल्या गटारांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, गटारातून सातत्याने घाण पाण्याचा प्रवाह वाहत आहे. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी येथील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.



या गंभीर समस्येकडे नवी मुंबई महानगरपालिका तसेच कोपरखैरणे वॉर्ड कार्यालयातील संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने संताप व्यक्त होत आहे. नागरिकांची ठाम मागणी आहे की, शहरातील गटारे व फुटपाथ तातडीने स्वच्छ करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी. तसेच नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात. अन्यथा नागरिकांमध्ये तीव्र आंदोलन छेडले जाऊ शकते, असा इशाराही देण्यात येत आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सेवा, संघर्ष आणि विकासाचा चेहरा बाबाजी पाटील पुन्हा जनतेच्या विश्वासावर

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिका निवडणूक ही केवळ राजकीय समीकरणांची लढाई नसून जनतेच्या विश्वासाची खरी कसोटी मानली जाते. या कसोटीवर सातत्याने उतरून कामातून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या उमेदवारांमध्ये शिवसेनेचे उमेदवार माजी नगरसेवक बाबाजी पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात आहे. बाबाजी पाटील म्हणजे घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष कामाचा ठसा अशी ओळख नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. ऐतिहासिक खिडकाळी गावात जन्मलेले बाबाजी पाटील हे संघर्षातून घडलेले आणि मातीशी नातं जपणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत समाजाच्या प्रश्नांशी



थेट सामना करत त्यांनी २०१७ ते २०२२ या कालावधीत ठाणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २९ चे नगरसेवक म्हणून त्यांनी पदाला केवळ प्रतिष्ठा मिळवून दिली नाही, तर जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवला. प्रभागातील विकासकामे केवळ रस्ते, नाले किंवा पथदिव्यांपुरती मर्यादित राहिली नाहीत. स्वच्छ रस्ते, नियमित पाणीपुरवठा, सक्षम ड्रेनेज व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, एलईडी पथदिवे, बसथांबे, बाकडे, दिशादर्शक फलक, उद्याने, वाचनालये अशा विविध कामांतून प्रभागाचा चेहरामोहरा बदलला.

कोरोना महामारीच्या काळात बाबाजी पाटील यांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. आरोग्य हा विषय केवळ कागदोपत्री न ठेवता त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून काम केले. मोफत मास्क, सॅनिटायझर व औषधांचे वाटप, कोरोना तपासणी व लसीकरण शिबिरे, रुग्णांसाठी बेड व ऑक्सिजनची व्यवस्था तसेच गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे वितरण करून त्यांनी शिवसेनेची ‘सेवा हीच राजकारण’ ही परंपरा जपली.



## मथुराबाई मदने यांचे निधन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील पार्डी (म) येथील सांप्रदायीक क्षेत्रातील जेष्ठ नागरिक मथुराबाई बाबूराव मदने (वय ८० वर्ष) यांचे दीर्घ आजाराने दि.६ मंगळवारी रोजी रात्री निधन झाले,त्यांच्या पार्थीवावर दि.७ बुधवारी रोजी सकाळी ११ वा.पार्डी म.येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मथुराबाई मदने यांच्या पश्चात २ मुले व ७ मुली,सुना,नातवंडे,पणतू असा मोठा परीवार आहे. त्या बळवंतराव मदने,व्यंकटराव मदने यांच्या आई होत.माधव मदने यांच्या आजी होत.

## पत्रकार प्रकाश कुलथे यांना दर्पण पुरस्कार प्रदान

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर येथील ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलथे यांना वृत्तपत्र क्षेत्रातील प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार पत्रकार दिनी बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मगाव असलेल्या पोंभुर्ले तालुका देवगड जिल्हा सिंधुदुर्ग येथील स्मारक म्हणून उभारलेल्या दर्पण सभागृहात महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती घोडमिसे, पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ, उपाध्यक्ष कृष्णा शेवडीकर, माजी आमदार रमेश जठार, मुंबई आकाशवाणीचे सहाय्यक केंद्र संचालक जयेंद्र भाटकर उपस्थित होते.




समारंभात बोलताना प्रा. ना. राम शिंदे यांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची भूमिका बजावताना पत्रकारांनी समाजाभिमुख निर्भीड व मूल्याधिष्ठित पत्रकारिता जपली पाहिजे असे मत व्यक्त करत प्रकाश कुलथे यांनी दीर्घकाळ केलेल्या निष्ठावान व सामाजिक बांधिलकीच्या पत्रकारितेचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

आजच्या वेगवान आणि बदलत्या माध्यम क्षेत्रातही पत्रकारिता आपले अस्तित्व टिकवून आहे. याचे श्रेय आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी घालून दिलेल्या धोरणांना जाते बाळशास्त्रींनी संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दिली आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्यावतीने दिला जाणारा दर्पण पुरस्कार हा बाळशास्त्रींच्या नावाने दिला जातो म्हणूनच तो पत्रकारितेतील सर्वोच्च सन्मान आहे असे म्हणाले.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्म गावातील स्मारक प्रकल्पासाठी मी माझ्या स्थानिक विकास निधीतून निश्चितपणे निधी उपलब्ध करून देईल अशी ग्वाही देत ग्रामपंचायत व पत्रकार कल्याण निधीने या संदर्भात तातडीने अहवाल सादर करावा असेही त्यांनी नमूद केले.

समारंभाचे अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ म्हणाले, पोभूंले हे गाव महाराष्ट्रातील पत्रकारांची पंढरी व्हावी या भावनेतून हे स्मारक उभारले आहे.,आम्ही श्रद्धेने जांभेकरांच्या कार्याचा जागर करत आहोत बाळशास्त्रींची विद्वत्ता पत्रकारिता आणि संशोधन क्षेत्रातील त्यांचे महान कार्य आजही मार्गदर्शक आहे.

## अगस्ती विद्यालयाचा पारितोषिक समारंभ संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले येथील श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या 60 वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. विद्यालयाने नुकतीच हिरकमहोत्सवाकडे वाटचाल केली असून वेब सिरीज मराठी सिने अभिनेत्री अपेक्षा चव्हाण यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.सिने दिग्दर्शक रविंद्र निंबाळकर, एम के स्टुडिओ चे मालक तथा चित्रपट निर्माते मच्छिन्द्र धुमाळ, बालकलाकार शुभम सावंत, कार्यकारी निर्माता महेश नाईक, अभिनेते विराज लटके व पटकथा लेखक संकेत आवळे यांची प्रमुख उपस्थिती यावेळी विशेष लक्षवेधी ठरली.आपल्या प्रास्ताविकेतून विद्यालयाचे प्राचार्य मंगेश खांबेकर यांनी विद्यालयाच्या




यशाचा वाढता आलेख समोर ठेवत थोर स्वातंत्र्यसेनानी गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांच्यासारख्या व्यक्तीमत्वाने अत्यंत त्याग, समर्पण,सचोटी आणि जिद्दीने ही संस्था प्रगतीपथावर नेत सर्व क्षेत्रात संस्थेला शिखरावर नेऊन ठेवले आहे.आजही बाबा आणि आयुष्यभर बाबांना शैक्षणिक कार्यात मोलाची साथ देणाऱ्या व सर्वांवर मायेची पाखरं धरणाऱ्या स्व. संस्थेच्या भूतपूर्व सेक्रेटरी दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांची शेवटपर्यंत संस्थेला वाहून घेण्याची तळमळ आम्हा सर्वांनाच प्रेरणादायी आहे. आपल्या अहवाल वाचनात पोपट सदगीर यांनी विद्यालयाने तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीपर्यंत असलेली शाळेची कामगिरी सांगत गुणवत्ता हेच आमचे ब्रीद या वचनाप्रमाणे विविध परीक्षा, एस एस सी परीक्षाचा निकाल, एच एस सी परीक्षा निकाल आदी सर्व गुणवंत विद्यार्थी यांच्या यशाचा चढता आलेख उपस्थित पाहुण्यांसमोर मांडला.यावेळी प्रमुख पाहुणे मराठी सिने अभिनेत्री अपेक्षा चव्हाण यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करत त्यांना प्रोत्साहित केले. विद्यालय सर्वच क्षेत्रात अव्वल स्थानावर असल्याने सर्वांचे कौतुक करत संस्थेच्या दीर्घकालीन यशाच्या वाटचालीबाबत समाधान व्यक्त करत शहरांलाही लाजवेल इतके उपक्रम, गुणवत्ता व सातत्य याबाबत आपल्या सर्वांचेच योगदान अधिक असल्याचे सांगितले. शिक्षक व पालक यांच्याशी अधिक सहजपणे, मोकळेपणाने विद्यार्थ्यांनी बोलण्याची आवश्यकता असून त्यांच्यात निखळ संवाद हवा. आज संवादच संपल्याने विद्यार्थी असुरक्षित व एकाकी आहे. फोनचा वापर विद्यार्थ्यांनी न करता आपल्या आवडी निवडी जपत विविध खेळ, व्यासंग आपली पहिली पसंती असायला हवी. सर्वच उपक्रमात विद्यालय पुढे आहे म्हणून आपले स्थान अधिक बळकट आणि सशक्त करा असे आवाहन त्यांनी केले.आपल्या अध्यक्षीय भाषणात शैलजा पोखरकर यांनी एस एस परीक्षेत नेहेमीच संस्थेचेच पहिले पाच विद्यार्थी तालुक्यात चमकत असतात हा आतापर्यंतचा इतिहास असून संस्था स्तरावर यासंबंधी एकाच वेळी काटेकोरपणे नियोजन केलेले असते असे स्पष्ट करून बाबांनी उभा केलेला हा ज्ञानयज्ञ अखंडपणे सुरु ठेवण्यासाठी अधिक सजग राहण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी,पत्रकार विजय पोखरकर, डॉ निलेश सहाणे, माधवराव तिटमे,सचिन शिंदे, गिरीश नवले, सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब पारदे, लक्ष्मण आव्हाड, दिलीप शेणकर, सुरेश कोकणे, आर टी सोनवणे यांचेसह आजी माजी कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची अध्यक्षीय सूचना पद्मा भारती यांनी मांडली व या सुचनेला अनुमोदन सुनिता नाईकवाडी यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश आरोटे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रामचंद्र आवारी यांनी करून दिला तर आभार पर्यवेक्षक नंदा गोपाळे यांनी मानले.

शालेय, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील सांस्कृतिक, कला, क्रीडा, वाङ्मय, गणित -विज्ञान आदी बक्षीसांचे वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

## डॉ. विजय भटकर यांना जीवनगौरव पुरस्कार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण ठरलेल्या VLSID 26 पुरस्कार सोहळ्यात व्हीएलएसआय सोसायटी ऑफ इंडियातर्फे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय पी. भटकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. PARAM मालिकेतील महासंगणकांची उभारणी आणि देशात VLSI तसेच उच्च-कार्यक्षमता संगणन (HPC) क्षेत्राच्या विकासासाठी दिलेल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे डॉ. भटकर यांना “भारतातील सुपरकॉम्प्युटिंगचे जनक” म्हणून ओळखले जाते. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार व्हीएलएसआय सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. सत्य गुप्ता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी VLSID 26 आयोजन समितीतील प्रमुख सदस्य शैलेश परब, वीरेश शेट्टी, सुमित गोस्वामी, हेमंत माने, महेश



बुटाला, संजय घोरपडे आणि रंजित येवले उपस्थित होते.

या सन्मानाद्वारे सेमीकंडक्टर डिझाइन, संशोधन आणि तंत्रज्ञान नेतृत्व क्षेत्रात डॉ. भटकर यांनी दशकानुदशके घडवून आणलेल्या परिवर्तनकारी योगदानाची दखल घेण्यात आली. त्यांच्या कार्यामुळे भारतातील VLSI परिसंस्थेला भक्कम आकार मिळाला आहे.

पुरस्काराची घोषणा होताच सभागृहात उपस्थितांनी उत्स्फूर्त उभे राहून टाळ्यांच्या गजरात डॉ. भटकर यांना मानवंदना दिली. प्रशस्तिपत्रात C-DAC (Centre for Development of Advanced Computing) मधील त्यांचे नेतृत्व, प्रारंभीची ASIC/ASIC डिझाइनमधील उल्लेखनीय कामगिरी, तसेच सेमीकंडक्टर शिक्षण व नवोन्मेष क्षेत्रातील त्यांचा सातत्यपूर्ण मार्गदर्शक सहभाग यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

राष्ट्रीय संस्थांच्या स्थापनेतील मोलाचे योगदान, सुपरकॉम्प्युटिंग पायाभूत सुविधांची निर्मिती, तसेच VLSI व उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक पिढ्यांतील अभियंते व संशोधकांना दिलेली प्रेरणा—असे डॉ. भटकर यांचे कार्यक्षेत्र व्यापक आहे. यापूर्वी त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि महाराष्ट्र भूषण या मानाच्या नागरी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. VLSID 26 मधील जीवनगौरव पुरस्कार हा भारतीय विज्ञान व तंत्रज्ञानातील त्यांच्या अढळ वारशावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करणारा ठरला आहे.

# सामाजिक तळमळीतून घडलेले साहित्यिक ज्येष्ठ कवी परशुराम नेहे!

**(समर्थ गांवकरी)**

वारकरी परंपरेचा गाभा, सामाजिक बांधिलकीची ठाम जाणीव आणि शब्दांतून वाहणारी माणुसकी यांची सुरेख सांगड म्हणजे ज्येष्ठ कवी परशुराम दादा पाटील नेहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेले आणि कामगार चळवळीच्या संस्कारात घडलेले नेहे सर आज मराठी साहित्यविश्वात तसेच सामाजिक क्षेत्रात आदराने घेतले जाणारे व्यक्तिमत्त्व ठरले आहे.




१९५२ साली श्री क्षेत्र सावरगाव पठ, ता. अकोले, जि. अहमदनगर या पावन वारकरी भूमीत त्यांचा जन्म झाला. वारकरी संप्रदायाशी नाळ जुळलेल्या कुटुंबात कीर्तन, भजन, अभंग व संतवाङ्मयाचे संस्कार लहानपणापासूनच त्यांच्यावर झाले. अभ्यासू, कष्टाळू आणि संवेदनशील स्वभावाच्या नेहे सरांनी पुढे शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य माणसाच्या जगण्यातील संघर्ष आपल्या कवितेतून मांडत साहित्यिक वाटचाल केली.

नेहे सरांच्या काव्यात साधी, सरळ पण धारदार भाषा आढळते. श्रमिकांच्या घामाला, कष्टकरी माणसांच्या वेदनांना आणि वारकरी भावविश्वातील भक्तीला ते शब्दरूप देतात. “रामनामात राहिल्याने अहंकार नाहीसा होतो आणि जीवनात समाधान व शांती लाभते,” हा त्यांचा ठाम विश्वास त्यांच्या लेखनात वारंवार दिसून येतो. त्यांच्या कवितेत देव केवळ मंदिरात नसून भुकेल्या माणसात, शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यात आणि कारखान्यातील कामगारात वसलेला आहे, असा मानवतावादी दृष्टिकोन प्रकर्षाने जाणवतो.

मुंबई–ठाणे परिसरात वास्तव्यास असतानाही त्यांनी आपल्या मूळ गावाशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. अकोले तालुक्यासह ग्रामीण भागातील सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांत ते सक्रिय राहिले. विविध संस्था व संघटनांच्या माध्यमातून वंचित घटक, प्रवासी कामगार आणि छोट्या शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी सातत्याने मांडले. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरावे, हा त्यांच्या लेखनाचा मूलस्वर राहिला आहे.

नेहे सरांना लंडन व युरोपमध्ये सुमारे सहा महिने वास्तव्यास जाण्याची संधी लाभली. तेथील शिस्तबद्ध जीवनशैली, कर्तव्यनिष्ठा आणि देशप्रेम त्यांनी जवळून अनुभवले. या अनुभवांचे प्रभावी प्रतिबिंब त्यांच्या ‘लंडनवारी’ या कवितासंग्रहात दिसून येते. परदेशात राहूनही मातृभूमीबद्दलची ओढ, मातीतल्या माणसांविषयीची आपुलकी आणि आध्यात्मिक दृष्टिकोन त्यांच्या कवितांमधून ठळकपणे व्यक्त होतो.

समाजवादी विचारसरणी आणि कामगार चळवळीचा वारसा त्यांना सासरकडूनही लाभला. कम्युनिस्ट पक्षाचे शेतकरी व विडी कामगार नेते स्वर्गीय कॉम्रेड धोंडूभाऊ विष्णू वरपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चिखणी (ता. संगमनेर) येथे उभारण्यात आलेले भव्य स्मारक व प्रवेशद्वार हे नेहे सरांच्या सामाजिक कृतज्ञतेचे प्रतीक मानले जाते. साहित्य, समाजकार्य आणि श्रमिक चळवळ या तिन्हींच्या संगमातून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध झाले आहे.

त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई नेहे यांना भजन, कीर्तन व समाजकार्याची विशेष आवड आहे. गंगोत्री हाउसिंग सोसायटीत मानद सचिव म्हणून त्यांनी काम केले असून ‘सूर संगम’ महिला भजनी मंडळाच्या माध्यमातून भजनपरंपरेला त्यांनी नवी उभारी दिली. मोठे चिरंजीव प्रदीप नेहे लंडन येथे एका नामांकित तंत्रज्ञान कंपनीत कार्यरत असून, धाकटे चिरंजीव सागर नेहे समाजशील पत्रकार म्हणून जनसंपर्क क्षेत्रात कार्य करतात. नातवंडांमध्ये स्वामी नेहे साहित्य, नृत्य व वाद्यसंगीताकडे आकर्षित असून इंग्रजी भाषेत कविता रचतो, तर नाथ सई नेहे जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत आहे. संपूर्ण नेहे परिवारच कला, संस्कृती व सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे नेत आहे.

नेहे घराण्याची वारकरी व कीर्तन परंपरा पुढील पिढ्यांनीही जपली आहे. कीर्तन, प्रवचन व अभंगांच्या माध्यमातून अध्यात्म आणि सद्सद्विवेकबुद्धीचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य अखंड सुरू आहे.

साहित्यिक, समाजमनाचा अभ्यासक आणि कीर्तनपरंपरेचा वारसदार अशा बहुआयामी भूमिकांमधून परशुराम नेहे सरांनी अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त केले; मात्र त्यांनी नेहमीच साधेपणा जपला. “लकीरे नहीं मेरे चेहरे पर, मगर वक्त ने मुझ पर दस्तकारी की है,” असे सांगत ते आयुष्याने दिलेल्या अनुभवांकडे कृतज्ञतेने पाहतात. कर्तृत्व, संयम, समंजसपणा आणि अध्यात्मिक दृष्टिकोन यांच्या बळावर त्यांनी समाजात सकारात्मकता निर्माण करण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त साहित्यविश्व, कामगार बांधव, वारकरी समाज तसेच मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सामाजिक न्याय, मानवी एकात्मता आणि अध्यात्मिक मूल्यांचा संदेश देणारी त्यांची लेखणी आगामी पिढ्यांना नवी दिशा देत राहो, हीच सर्वांची मनःपूर्वक अपेक्षा.

# रेडमी नोट 15 5जी आणि रेडमी पॅड 2 प्रो भारतात दाखल

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



मोठ्या स्क्रिन आकारासह प्रभावी कार्यक्षमतेची जोड देत शाओमी इंडियाने भारतात रेडमी नोट १५ ५जी आणि रेडमी पॅड २ प्रो ही नवी उपकरणे बाजारात आणली आहेत. दैनंदिन वापरासाठी विश्वासार्ह कामगिरी, उत्तम मनोरंजन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा देण्यासाठी ही उत्पादने डिझाइन करण्यात आली असून, भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन ही लॉंचिंग करण्यात आली आहे. चालता-फिरता काम, पेमेंट्स, संवाद आणि घरच्या घरी मनोरंजनाचा वाढता वापर पाहता, मोठी स्क्रीन आणि बॅटरी क्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. रेडमी नोट १५ ५जी हे स्मार्टफोन वास्तव जीवनातील गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आले असून, एमआयएल-एसटीडी-८१०एच आधारित एसजीएस-चाचणी केलेला टिकाऊपणा आणि आयपी६६ रेटिंगमुळे अपघाती पाणी, धूळ व धक्क्यांपासून संरक्षण मिळते. १०८ मेगापिक्सेल मास्टरपिक्सेल ड्युअल एआय कॅमेरा, ओआयएस सपोर्ट आणि ३× इन-सेन्सर झूममुळे दैनंदिन फोटोग्राफी आणि ४ के व्हिडिओ रेकॉर्डिंग अधिक स्थिर व स्पष्ट होते. २० मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा सेल्फी आणि व्हिडिओ कॉलसाठी उपयुक्त ठरतो. ५५२० एमएएच सिलिकॉन-कार्बन बॅटरी, ४८ वॅट फास्ट चार्जिंग आणि १८ वॅट रिव्हर्स चार्जिंगमुळे दिवसभर वापरासाठी हा फोन विश्वासार्ह ठरतो. या स्मार्टफोनमध्ये १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट असलेला कर्व्ह एएमओएलईडी डिस्प्ले, उच्च ब्राइटनेस आणि डॉल्बी ॲटमॉससह ड्युअल स्टीरिओ स्पीकर्स देण्यात आले आहेत. स्नॅपड्रॅगन ६ जेन ३ प्रोसेसर, अँड्रॉइड १५ आणि शाओमी हायपरओएस २ मुळे गतीशील कामगिरी आणि दीर्घकालीन सॉफ्टवेअर सपोर्ट मिळतो.

दुसरीकडे, रेडमी पॅड २ प्रो हा मोठ्या स्क्रिनचा टॅबलेट मनोरंजन, अभ्यास, ऑनलाइन मीटिंग्स आणि मल्टीटास्किंगसाठी डिझाइन करण्यात आला आहे. २.५के रिझोल्यूशनचा मोठा डिस्प्ले, १२० हर्ट्झ ॲडप्टिव्ह सिंक आणि डॉल्बी व्हिजनमुळे दृश्य अनुभव अधिक समृद्ध होतो. स्नॅपड्रॅगन ७एस जेन ४ प्लॅटफॉर्म आणि मोठ्या क्षमतेची बॅटरी दीर्घकाळ वापराची सुविधा देते, तर फास्ट चार्जिंग आणि रिव्हर्स चार्जिंगमुळे दैनंदिन सोय वाढते. शाओमी हायपरओएस २ वर चालणारा रेडमी पॅड २ प्रो इतर शाओमी डिव्हाईसेसशी सहज कनेक्ट होतो. रेडमी स्मार्ट पेन आणि कीबोर्डसारख्या ॲक्सेसरीजमुळे हा टॅबलेट विद्यार्थी, व्यावसायिक आणि क्रिएटर्ससाठी उपयुक्त ठरतो. दीर्घकालीन सॉफ्टवेअर आणि सिक्युरिटी अपडेट्स, एआय-आधारित फीचर्स आणि मोठ्या स्टोरेज सपोर्टमुळे शाओमीचे हे नवे डिव्हाईस दैनंदिन इंटरकनेक्टिव्हिटीसाठी मजबूत पर्याय म्हणून पुढे येत आहेत.



वैजापुर : लांडेवस्ती (ता. वैजापूर ) येथील जिल्हा परिषद प्रशालेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी अनेक मुलींनी वेशभुषा धारण केली होती. (छायाचित्र - - कुंडलीक वाळेकर )

## थोडक्यात बातम्या...



### रेडिओच्या माध्यमातून फोफसंडीला जागतिक ओळख देण्याचा संकल्प

अकोले (स. गांवकरी) : रेडिओ स्टेशन च्या माध्यमातून अकोले तालुक्यातील फोफसंडी या अतिदुर्गम गाव जगाच्या नकाशावर आणण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाणार असून यासाठी सन 2028 मध्ये जगभरातील सर्व शास्त्रज्ञ यांना शिर्डी येथे निमंत्रित करण्याचा मानस असून आहे असे प्रतिपादन नेवासा नगरपंचायतचे नूतन नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी व्यक्त केला. अकोले तालुका क्रांतिकारकांचा इतिहास असलेला व सांप्रदायिक शक्तीचा मोठा वाटा असलेले नेवासा या दोन्ही तालुक्यांची शक्ती एकत्रित आल्यावर भविष्यात चांगले काम उभे राहू शकतेअसल्याचेही डॉ. घुले यांनी सांगितले.नेवासा नगरपंचायतचे नूतन नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांनी अकोले नगरपंचायतीस सदिच्छा भेट दिली. यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक बाळासाहेब मुळे, भाजपचे ज्यष्ठ नेते भाऊसाहेब वाकचौरे, मुख्याधिकारी धनश्री पवार, नगरसेवक विजय पवार ,आरिफ शेख, नवनाथ शेटे, अमोल वैद्य, नेवासा येथील बांधकाम कामगार आरोग्य योजनेचे कार्यकर्ते अनंत पवार , उबेद शेख,सिद्धेश देशमुख, ,बांधकाम कामगार प्रतिनिधी पांडुरंग मते सामाजिक कार्यकर्ते अनिकेत ढोकणे, उत्तम शेणकर यांचे सह नगरपंचायतचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. घुले पुढे म्हणाले की, विद्यार्थी परिषदेची पार्श्वभूमी असलेला आपण कार्यकर्ता असून विद्यार्थीच्या न्याय हक्कासाठी अनेक लढे दिले वेळप्रसंगी विद्यापीठ बंद करण्यापर्यंतचे आंदोलन केले. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला. नेवासा येथे समर्पण फाउंडेशन मार्फत ग्रामीण भागात नेत्रदानाची 442 शिबिरे आतापर्यंत घेतली समाजातील नेत्र जाण्याची उदासीनता दूर झाली समाज प्रबोधन होण्यास मदत झाली.

### फसवणुकीबाबत मा. तहसीलदार पोलिस स्टेशन व निबंधक यांना निवेदन सादर

श्रीरामपूर (स. गांवकरी) : तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयाच्या परिसरात काही एजंट - दलाल हे माजी सैनिक व सामान्य नागरिकांना शासकीय कामे उदा, उत्पन्न दाखला ,वारसा नोंद, जमिनीचे रेकॉर्ड ,खरेदीखत, विविध पेन्शन अनुदान विषयक कामे इत्यादी करून देण्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात पैसे उकळत आहेत ,प्रत्यक्षात मात्र संबंधित कामे न करता नागरिकांची आर्थिक फसवणूक दलालांच्या माध्यमातून केली जात आहे विशेषत माजी सैनिक हे शासनाच्या नियम प्रक्रिये बाबत संपूर्ण अनभिज्ञ असल्याने या एजंटांच्या भूलथापांना सहज बळी पडत असून अनेक माजी सैनिक व सामान्य नागरिकांचे आर्थिक नुकसान होत आहे काही प्रकरणात जादा रक्कम आकारल्याने पैसे परत मागितल्यास टाळाटाळ शिवीगाळ व धमकी देण्याची प्रकारही सातत्याने घडत आहेत याहून अधिक गंभीर बाब म्हणजे काही एजंट /दलाल हे शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईलद्वारे परवानगीशिवाय ऑडिओ रेकॉर्डिंग व व्हिडिओ चित्रीकरण करत असून सदर रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन बेकायदेशीर व नियमबाह्य कामे करून घेण्याचा व अनाठाई आरडाओरड व मोठ्या आवाजात बोलून नामे ,नानासाहेब रखमाजी गाडे रा, गाडे वस्ती बेलापूर (खुर्द) याने माजी सैनिक मेजर अशोक साबळे यांची फसवणूक केली आहे तीच व्यक्ती हे करीत आहेत या प्रकारामुळे प्रामाणिक अधिकारी कर्मचारी मानसिक दबावाखाली काम करत असून शासकीय प्रशासनाच्या शिस्तीला प्रतिष्ठेला व कार्यपद्धतीला गंभीर धोका निर्माण झाला आहे.


#### जाहीर नोटीस

१. भाऊसाहेब परशराम महाले २. विठ्ठल परशराम महाले
रा. बेलापुर, ता.अकोले, जि. अहिल्यानगर ........अर्जदार

विरुध्द ......... १. नामदेव विष्णु महाले (मयत) २. मारुती नामदेव महाले (मयत)
दोघेही रा. बेलापुर, ता.अकोले, जि.अहिल्यानगर ..........सामनेवाले

या नोटीसीव्दारे कळविणेते येते की, भाऊसाहेब परशराम महाले व इतर १, रा. बेलापुर ता. अकोले, यांनी मौजे बेलापुर, ता. अकोले येथील स.न ८१५, ८१६ व १२५ या ७/१२ मधील इतर हक्कात दाखल असलेली नावे नामदेव विष्णु महाले (मयत) व मारुती नामदेव महाले (मयत) पोकळीस्त म्हणुन कमी होणेबाबत दिनांक १०/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक. २७/०१/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले यथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी पोकळीस्त म्हणुन इतर हक्कातील नावे असलेल्या व्यक्तींचे कोणी वारस असल्यास सदर वारसांनी अथवा कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,

क्र.कावि./आरटीएस/प्र.क्र.२३३५/२०२५
अकोले दि. ०६/०१/२०२६

तहसिलदार अकोले तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले
जिल्हा अहिल्यानगर


# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष - वैशाली जोशी

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




हिंद सेवा मंडळाच्या अकोले विभागातील ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेचा 36 वे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन संपन्न झाले .

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना वैशाली जोशी पुढे म्हणाल्या की अकोल्यात ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा ही सर्वच समाज घटकातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाकडे वैयक्तीक लक्ष दिले जाते . लेखन वाचन अंकगणित मराठी इंग्रजी बरोबरच विविध कला व क्रीडा गुणांकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते म्हणूनच विविध क्षेत्रात विद्यार्थी यश संपादन करीत आहेत .स्थानिक मान्यवरांचे या शाळेस नेहमीच अर्थिक सहकार्य मिळत आहे .

या कार्यकमाचे प्रमुख अतिथी म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे उपस्थित होते त्यांनी शालेय विद्यार्थी यांचेबरोबर खेळ व्यायाम अभ्यास व संस्कार याबाबत संवाद साधला .

याप्रसंगी शाळेच्या ज्येष्ठ संचालिका सुधाताई देशपांडे यांनी बालकमंदिर विभागासाठी ८ सायकल, प्रभावती महाले व श्रीकृष्ण जोशी व पूणे येथील श्रावी कुलकर्णी यांनी पारितोषिक वितरण व गरज विद्यार्थ्यांसाठी अर्थिक सहकार्य केले.

या कार्यक्रमासाठी व्यासपिठावर स्थानिक पदाधिकारी रामेश्वर रासने, स्मिता मुंदडा , मोरेश्वर धमाधिकारी, बाळासाहेब वडजे , पत्रकार अमोल वैद्य ,कार्यकारिणी सदस्य दिलीपभाई शहा, संचालिका पुष्पा वाणी,सुरेखा धर्माधिकारी, माजी प्राचार्य संतोष कचरे, प्राचार्या चित्रा कांबळे पर्यवेक्षक सुधीर जोशी योगिता कुलकर्णी , अण्णा संत, कल्याण लकडे , भिकाजी कांबळे, उपस्थित होते .

मान्यवरांचा अकोल्यातील निसर्गरम्य पर्यटन स्थळांचे फोटो देवून सन्माण करण्यात आला .

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोनाली मालवणकर यांनी केले . मान्यवरांचा परिचय दत्ताभाऊ पोपेरे यांनी करून दिला .स्वागत व प्रास्तविक मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी केले . अध्यक्षीय सूचन किरण शेळके यांनी तर आभार बाळासाहेब मांडे यांनी मानले . कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शालेय शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# राज्यात ९,००० शिक्षकांची भरती होणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकाच्या शाळांमध्ये शिक्षक भरती होणार आहे. सुमारे ९००० शिक्षकांची भरती केली जाणार आहे. यामध्ये २०२४-२५ आणि मे २०२६ पर्यंत सेवानिनृत्त होणाऱ्या जागांचादेखील समावेश आहे. राज्यातील शिक्षक भरती पवित्र पोर्टलद्वारे होणार आहे. मार्चपासून ही भरती प्रक्रिया सुरु केली जाणार आहे, असं शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे. अनेकदा शाळेत शिकवण्यासाठी शिक्षकच नसतात. यावर हिवाळी अधिवेशनात आमदारांनी शिक्षक भरतीची मागणी केली. याच पार्श्वभूमीवर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पदे भरली जाणार आहे. यामध्ये जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांमध्ये ५,७०० पदे रिक्त आहेत. २५ मार्च २०२४ च्या निर्णयानुसार, जिल्हा परिषदेच्या शाळांची २०२५-२६ मध्ये संचमान्यता पूर्ण झाले. यामध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे पहिल्यांदाच समायोजन करणार आहेत. यामध्ये रिक्त पदांच्या ८० टक्के जागा भरल्या जाणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांना २०२६ मेपर्यंत निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पदे समाविष्ट करुन त्याची जाहिरात अपलोड करण्यास सांगितले आहे. पवित्र पोर्टलवरुन ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

# अल्ट्रा लक्झरी मोबिलिटीत लेक्सस इंडियाची भक्कम आघाडी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

वर्ष २०२५ मध्ये एलएम आणि एलएक्स मॉडेल्सच्या जोरावर अल्ट्रा लक्झरी मोबिलिटी क्षेत्रात लेक्सस इंडियाने आघाडी मिळवली आहे. भारत, जानेवारी २०२६ – लेक्सस इंडियाने २०२५ हे वर्ष भक्कम कामगिरीसह पूर्ण केले असून, अल्ट्रा लक्झरी वाहनांच्या वाढत्या मागणीचा थेट लाभ कंपनीला मिळाला आहे. वार्षिक तुलनेत एलएम आणि एलएक्स मॉडेल्सने ५० टक्के वाढ नोंदवली असून, एकूण विक्रीत १९ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामधून उच्च दर्जाच्या लक्झरी वाहनांकडे ग्राहकांचा वाढता कल स्पष्ट होतो. कंपनीच्या प्रमुख एलएम आणि एलएक्स मॉडेल्सना २०२५ मध्ये ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, गेल्या वर्षाच्या तुलनेत विक्रीत २२ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामुळे एसयूव्ही विभागातील लेक्सस ब्रँडची मजबूत उपस्थिती आणि बाजारपेठेतील स्वीकार अधोरेखित झाला आहे. एलएक्स आणि एलएम ही मॉडेल्स लेक्ससच्या टॉप-एन्ड पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाची ठरली असून, पाहुण्यांना अजोड लक्झरी, सुधारित तंत्रज्ञान आणि उच्च दर्जाचा आराम देत आहेत.

# पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री यांना अभिवादन

## विविध क्षेत्रातून पत्रकारांचा सत्कार

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



तामसा येथे पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आलं.तामसा येथे पत्रकार भवनात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजन करून अभिवादन पत्रकार संघातर्फे करण्यात आलं. विविध क्षेत्रातून पत्रकारांचा सत्कार करण्यात आलं तामसा ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच आनंद घंटळवार, उप सरपंच प्रतिनिधी खाजाभाई कुरेशी, माजी सरपंच बालाजी महाजन, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड, सदस्य शिवराज वारकड, आकाश जाधव अभियंता अविनाश पांडे तसेच माजी उपसभापती शंकर मेंडके, सामाजिक कार्यकर्ते जगदेवराव पवार, नंदू देशमाने, चिकित्सा विभागात तालुका चिकित्सा अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, डॉ.मोहिनी सूर्यवंशी, डॉ. दिपक जीवने, बाबासाहेब बिडकर, पोलीस ठाण्याचा वतीने सपोनि शहदेव खेडकर, एएसआय अशोक सिंगणवाड, पोको प्रकाश कबले. सामाजिक कार्यकर्ते शिवसेना पदाधिकारी संतोष ठमके, दिलीप कोथळकर, सामाजिक कार्यकर्ते अरविंद कंठाळे, बालाजी कोल्हे, व्यापारी अशोसीयन च्या प्रतिष्ठित व्यापारी रवी बँडेवार, अंनता भोपळे, गणपत हनवते, बबन सेठ परभणकर, संजय यंगळवार सह विविध क्षेत्रातील पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते नी दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करून सत्कार करण्यात आला यावेळी मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष संजय राहुलवार, देवबा पाटील डोरले, गौतम कदम, बालासाहेब खांनजोडे, अर्जुन जोशी, अरविंद हुंडेकर, लक्ष्मण वाघमारे, गजानन जिंद्देवार, शिवदास बेलुरे, मारुती काकडे, राष्ट्रपाल, शिवाजी खुणे, संतोष डवरे, अंकुश मिराशे, महेश मठपती पत्रकाराचे सत्कार करण्यात आलं.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठाणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा सपत्नीक सत्कार







**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

लोकशाहीमध्ये पत्रकाराच्या हक्कावर मर्यादा आल्या आहेत. ना पगार ना मानधन,अशा परिस्थितीमध्ये पत्रकारांनी काय करावे यावर गांभीर्याने विचार करावा .पत्रकारांनी आपल्या लेखणीतून कुणाचे आयुष्य धुळीस मिळवू नये .ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी सपत्नीक सत्काराचा राबविलेला कार्यक्रम हा संघटनेत संघटनेत महाराष्ट्रभर राबविला जातो.ठाणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा सपत्नीक सत्कार आणि पत्रकारांचा सन्मान तसेच दहा गाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून मुख्याध्यापिकेसह आरोग्य विभागतील डॉक्टर रुपाली शेडगे यांच्यासह कर्मचाऱ्यांचा सत्कार ही बाब विशेष उल्लेखणीय ठरली असे उद्गार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी पत्रकार दिनाच्या निमित्ताने व्यासपीठावरून बोलताना काढले. पत्रकारांना शुभेच्छा देताना पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे (शहापूर) म्हणाले पत्रकाराची आणि आमची ड्युटी सारखीच असते. त्याचे काम बातमीचा मागोवा घेणे आणि छापणे हे त्यांचे कर्तव्य आहे तसेच घटनास्थळी जाऊन पंचनामा करणे,गुन्हा नोंदविणे आणि आरोपीचा शोध घेणे आमचे काम आहे.अश्यावेळी कधीकधी शाब्दिक संघर्ष होत असतो.परंतु ते तात्पुरते असते.शोध पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.असे प्रतिपादन पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (शरद पवार गट )तालुका अध्यक्ष नंदू मोगरे यांनी सुंदर कविता बोलून दाखविली. आपल्या मार्मिक भाषा वापरीत पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी पत्रकार संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संलग्न ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे,कार्याध्यक्ष संतोष गायकर,सचिव मिलिंद जाधव,उपाध्यक्ष तथा प्रहार जनशक्ती चे वसंत पानसरे,मुरबाड तालुका अध्यक्ष शेखर भोईर,उपाध्यक्ष ॲड गीता गायकर /एनकर ,उपाध्यक्ष संजय भोईर, ॲड नितीन पंडित (भिवंडी मनपा क्षेत्र अध्यक्ष ),कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे, शहापूर तालुका अध्यक्ष संजय भालेराव,यांच्यासह सर्व पत्रकारांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

वासिंद प्राथमिक आरोग्य केंद्र च्या डॉ.रुपाली शेडगे मैडम, जिल्हा परिषद शाळा दहा गाव शाळेच्या मुख्याध्यापिका, यांच्या सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संलग्न ठाणे जिल्हाच्या पत्रकार दिना निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे,पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष नंदकुमार मोगरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वाशिंद शहर अध्यक्ष संदीप पाटील,सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, प्रा. आ. केंद्र वाशिंद चे डॉक्टर रुपाली शेडगे, दहा गाव जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका,यांच्यासह भिवंडी,शहापूर, मुरबाड, कल्याण तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाळशास्त्री जांभेकर दर्पण दिन अर्थात पत्रकार दीन 5 जानेवारी 2026 रोजी दहागाव रोड वरील घोडविंदे फॉर्म हाऊस येथे पत्रकार दीन साजरा करण्यात आला.यावेळी सूत्रसंचलन मडके सर आणि मिलिंद जाधव यांनी केले.पत्रकार मिलिंद जाधव यांनी आई मला शाळेला जायचे हाय,तसेच शिक्षणाची सरस्वती सावित्री, भीमाई, रमाई शाळेत शिकविणे गरजेचे आहे असे मत मांडले.त्यांच्या गाण्याने शालेय विद्यार्थ्यामध्ये चैतन्य निर्माण झाले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# आमचा पत्रकार घेणारा नाही तर देणारा आहे

## विश्वासराव आरोटे : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने पत्रकार दिन साजरा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने ५ जानेवारी २०२६ रोजी शहापूर तालुक्यातील दहागाव येथील घोडविंदे फार्म हाऊस येथे बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन पत्रकारांचा सत्कार व सामाजिक बांधिलकीने साजरा करण्यात आला.तर शब्दशक्ती २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष भगवान चंदे शहापूर उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे प्रमुख म्हणून उपस्थित होते.तर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ठाणे जिल्हा शाखेकडून जिल्हा परिषद दहागाव शाळेतील विद्यार्थांना



शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव यांनी कविता सादर केल्या. तर यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शहापूर तालुका अध्यक्षपदी संजय भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आमच्या पत्रकार संघातील प्रत्येक पदाधिकारी ,पत्रकार प्रामाणिकपणे काम करीत असतो. पत्रकार घेणारा नाही तर इतरांना मदत करणारा असतो. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मंबई संलग्न,ठाणे जिल्हा शाखा नेहमी आदर्श ठरली आहे. असे यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी बोलतांना सांगितले.

पत्रकारांची आणि आमची ड्युटी सारखीच असते.त्याचे काम बातमीचा मागोवा घेणे आणि छापणे हे त्यांचे कर्तव्य आहे तसेच घटनास्थळी जाऊन पंचनामा करणे,गुन्हा नोंदविणे आणि आरोपीचा शोध घेणे हे आमचे काम आहे.अश्यावेळी कधीकधी शाब्दिक संघर्ष होत असतो.परंतु ते तात्पुरते असते.शोध पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.असे प्रतिपादन पोलिस उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी भगवान चंदे यासोबतच संतोष गायकर,संजय भोईर, संजय भालेराव, मिलिंद जाधव, वसंत पानसरे, मेघनाथ विशे, नितीन पंडित,योगेश गोडे, शेखर भोईर, अनिल पाटील ,गीता गायकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा सहपत्नीक तर पत्रकारांचा


सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नंदकुमार मोगरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाशिंद शहर अध्यक्ष संदीप पाटील, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, डॉ . रुपाली शेडगे,

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके यांनी केले तर आभार मिलिंद जाधव यांनी केले.

# आर्वी येथील महिलेने केले शोले स्टाईल आंदोलन

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील आर्वी येथील सविता बाबू कांबळे यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी जातीचा दाखला मिळत नसल्याने मंगळवार (दि .६ ) रोजी पहाटे तीनच्या सुमारास गावातच असणाऱ्या बीएसएनएलच्या १४० फुटीच्या टॉवर वर चढून शोले स्टाईल आंदोलन केले .दुपारी दीडच्या सुमारास ही महिला टॉवरवर असल्याचे काही ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्वरित नारायणगाव पोलीस स्टेशनला कळविले .'जोपर्यंत मुख्यमंत्री इथे येत नाहीत ,तोपर्यंत मी या टॉवरवरून खाली उतरणार नाही',असा पवित्रा तिने घेतला. त्यानंतर घटनास्थळी नारायणगावचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांच्यासह पोलीस पथक ,महसूल कर्मचाऱ्यांचे पथक ,जुन्नरच्या अग्निशमन दलाच्या गाडीसह चार जवान ,जुन्नर रेस्क्यू टीमचे जवान हजर झाले .त्यातील



संतोष रोकडे ,राजकुमार चव्हाण ,सुनील शिंदे ,लखन डाडर या जवानांनी तात्काळ टॉवरवर चढून या महिलेस खाली उतरा अशी विनंती करून त्यांना खाली आणले .त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले .अशी माहिती तहसीलदार डॉ .सुनील शेळके यांनी दिली . नारायणगाव पोलिसांनी सविता कांबळे यांच्याकडे या आंदोलनाविषयी विचारपूस केली असता ,त्यांनी सांगितले की ,माझे अनुसूचित जाती प्रवर्गात असलेले कांबळे कुटुंब हे कर्नाटकचे आहे .माझ्या मुलाला जुन्नर तालुक्यातील एका महाविद्यालयात काही वर्षांपूर्वी पदवी शिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला होता.मात्र, जात एससी प्रवर्गातून असल्याने शिष्यवृत्ती मिळून शुल्क माफ होईल असे सांगण्यात आले होते. मात्र, कर्नाटक राज्यात असलेल्या या संबंधित जातीचा उल्लेख महाराष्ट्रातल्या अनुसूचित जातीच्या यादीत नसल्याने तांत्रिकदृष्ट्या शिष्यवृत्तीला मुलगा प्राप्त होऊ शकला नाही.परिणामी.शुल्क भरावे लागेल या कारणामुळे मुलाचे शिक्षण थांबले.नंतर मुलगा दाखला काढण्यासाठी गेला असता, त्याला 60 हजार रुपये भरल्याशिवाय दाखला मिळणार नाही, असे सांगितल्याने मी हे पाऊल उचलले आहे असे सांगण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांच्यी विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे सदिच्छा भेट

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयुक्त छत्रपती संभाजी नगर किरण जाधव यांनी विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे सदिच्छा भेट देऊन ग्रामपंचायत मार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सात सुविधा बाबत तपासणी करून उत्कृष्ट सेवेबद्दल अभिनंदन केले.

राज्यसेवा हक्क आयुक्त किरण जाधव यांनी नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय येथे 7 जानेवारी रोजी भेट दिली यावेळी गट विकास अधिकारी प्रविण सुरडकर, सहाय्यक गट विकास अधिकारी मोहीते, विस्तार अधिकारी व्हि.बी.कांबळे,आर. केद्रे, यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सरपंच संध्याताई विलास हंबर्डे, ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे, ग्रामपंचायत




अधिकारी संजय कानोडे,संगनक चालक ऊग्रेसन हंबर्डे, संतोष हंबर्डे लिपीक कालीदास बारसे,माणिक हंबर्डे,साईनाथ पांचाळ , पत्रकार रमेश ठाकूर व सारंग नेरलकर यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तर संगनक चालक ऊग्रेसन हंबर्डे यांच्या आयुक्त किरण जाधव यांच्या हस्ते उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

आयुक्त किरण जाधव यांनी ऑनलाईन देण्यात येणाऱ्या सुविधा बाबत माहिती घेतली व वर्ष भर आढावा घेऊन उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशंसा केली यावेळी जिल्हा परिषद शाळेबाबत माहिती व ग्रामपंचायत कार्यालय सुसज्ज इमारत यासह अंगणवाडी सह अनेक माहिती घेतली.

# हातात रिव्हॉल्वर घेवून दहशत

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**


महापालिकेच्या प्रभाग क्र. १ मधील राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराच्या घरासमोर आ. संग्राम जगताप यांच्या बॉडीगार्डच्या हातामध्ये रिव्हॉल्वर असलेला व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी हा व्हिडीओ पोस्ट करत अहिल्यानगरमधील भयाण परिस्थिती उघडकीस आणल्याने शहरात खळबळ उडाली आहे.महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, उमेदवारांचा जोरात प्रचार सुरू आहे. निवडून येण्यासाठी अनेक फंडे वापरले जात आहे. समोर तुल्यबळ उमेदवार असला तर साम-दाम-दंड-भेद याचा वापर सुरू असतो. प्रशासन निर्भय वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी प्रयत्न करत असले तरी काही ठिकाणी दादागिरी व गुंडगिरीचा वापर केला जात आहे.

# कामठा (बु.) खंडेराय यात्रेस १५ पासून प्रारंभ; १६ रोजी भव्य पालखी सोहळा

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

जगात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेनंतर नांदेड जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर कामठा (बु.) ता. अर्धापूर येथील खंडोबारायाची यात्रा प्राचीन व ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. यात्रेत नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर आदी जिल्ह्यातून सर्व जाती धर्माचे भाविक मोठ्या संख्येने येतात. राष्ट्रीय सलोखा, ऐक्य जोपासणारे चित्र आपणास पाहावयास मिळते. दि. १५ रोजी खंडोबारायाच्या आरत्या सबिना निघणार आहे.

कामठा (बु.) येथील यात्रेस १५ फेब्रुवारी रोजी प्रारंभ होत आहे व १६ रोजी श्री मल्हार मार्तंड खंडेरायाची पालखी सोहळा दुपारी १ वाजता होणार आहे. यळकोट- यळकोट जय मल्हारच्या गजरात पालखीचा प्रारंभ होतो. मिरवणुकीत ढोल ताशाच्या गजरात खंडोबाचे वारु,चाबकाचे वार हातावर, पायावर घेत भाविक नाचत असतात. गावातून पालखी फिरवतांना भाविक टिपरे, बताशाचा प्रसाद



■ भव्य शंकर पट व कुस्त्याचे आयोजन

व पालखीवर शाल पांघरून दर्शन घेतात. दरम्यान गावच्या मध्यभागी बुरुजाजवळ दिगांबर हैबतराव डांगे हा भाविक नंग्या तलवारीचे पाच वार स्वतःच्या उघड्या पाठीवर व पोटावर घेतो. हे रोमहर्षक दृश्य पाहण्यासाठी प्रचंड मोठी गर्दी होत असते. शेवटी मंदिराजवळ भाविक लोटांगण घेतात त्यावरून पालखी मंदिरात जाऊन विसर्जित होते.

दि.१७ व १८ जानेवारी रोजी शंकर पटाची स्पर्धा होणार आहे. दि. १७ रोजी मान्यवरांच्या हस्ते सकाळी १० वाजता उद्घाटन होईल तर दि.१९ जानेवारी रोजी दुपारी २ वा. कुस्त्याचे उद्घाटन होईल. उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण,जि.म.बँक अध्यक्ष, माजी खा. भास्कर पाटील खतगावकर, भाजपाचे बी. आर. कदम,भाजप महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर,आ.श्रीजयाताई चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,जिल्हा परिषद मुख्याधिकारी मेघना कवली,पोनि. चंद्रशेखर कदम, माजी जि.प.अध्यक्ष संभाजी धुळगंडे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, सामाजिक कार्यकर्ते बालाजी काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शंकर पटाचे पहिले बक्षीस ३१,००१, शंकरराव चव्हाण यांच्या स्मरणार्थ माजी मंत्री भास्कर पाटील खतगावकर यांच्यातर्फे, जंगी कुस्त्यांचे पहिले बक्षीस ११,१११/- प्रशांत रावण वाघमारे यांच्यातर्फे ठेवण्यात आले आहे. उर्वरित भरपूर बक्षीसे आहेत. श्री. ची स्थापना १८ व्या शतकात रोजी निकम यांनी केली असे म्हणतात तो एक सच्चा भक्त होता त्याच्या मृत्यूनंतर गावकऱ्यांनी गावात समाधी स्थापन केली.या ठिकाणी आज मोठ्या श्रद्धेने भाविक या निमित्ताने जमा होतात. या दिवशी गावात दिवाळी सणासम उत्सव असतो. घराघरात पाहुण्यांची वर्दळ असते,संपूर्ण गाव भरभरून दिसते. ही यात्रा सर्व धर्म समभावाचे बोलके उदाहरण आहे येथे सर्व जाती पंथांचे लोक एक रुपयाने सामील झालेले दिसतात एकंदरीत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व पारंपारिक त्याची झलक येथे पाहताना मोठा आनंद होतो यात्रेत हवसे गवसे नवसे असेही चित्र पहावयास मिळते अशासाठी मनोरंजन म्हणून लोकनाट्याची मैत्री होतात यात्रेच्या तयारीसाठी ग्रामपंचायत कडून साफसफाई विद्युत रोषणाई व पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली जात आहे.

# पोलिस व पत्रकारांची भूमिका समान ठरेल : श्याम पानेगावकर

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा , कुंटुर , माजरंम , नरशी एकुण चार सर्कल अंतर्गत पत्रकार दिनानिमित्त नायगाव येथे समाजाच्या हितासाठी पोलिस व पत्रकार हे दोन्ही घटक सारखीच महत्त्वाची भूमिका बजावत असून, पत्रकारितेच्या बदलत्या प्रवाहात केवळ प्रिंट मीडियाच नव्हे तर सोशल मीडियानेही सजग व जबाबदार पावले उचलणे आवश्यक आहे. समाजहिताला केंद्रस्थानी ठेवून केली जाणारी पत्रकारिता ही आदर्श ठरेल आणि तीच पत्रकारिता जनतेच्या मनाला भावणारी ठरेल, असे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधीक्षक श्याम पानेगावकर यांनी केले.

ते पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार गौरव सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

व्हॉईस ऑफ मीडिया, तालुका यांच्या वतीने दि. ६




जानेवारी रोजी जनता हायस्कूल येथील स्व. माजी आ. बळवंतराव चव्हाण सभागृह, नायगाव येथे हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त प्राचार्य रमेश कदम, साहित्यिक व व्याख्याती प्रा. राजेश्वरी कदम, व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, ज्येष्ठ पत्रकार माधव मामा कोकुर्ले, शेख वहाबुद्दीन, भा. ग. मोरे सर, प्रा. डॉ. शंकरराव गडमवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात "समाजहितासाठी पत्रकारांचे योगदान" या विषयावर प्रा. राजेश्वरी कदम यांचे प्रभावी व्याख्यान झाले.

त्या म्हणाल्या, ग्रामीण भागातील जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असून, समाज घडवण्यात ग्रामीण पत्रकारांचे योगदान अनमोल आहे. दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्रामुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे त्यांनी नमूद केले.

पत्रकाराने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली नाही, तर समाज दिशाहीन होतो. म्हणूनच पत्रकाराची लेखणी ही निर्भीड, सजग व जबाबदार असली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. शासनाच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवण्याचे काम पत्रकार करतो. महिला सुरक्षा असो वा ग्रामीण विकास – सर्वच क्षेत्रांत पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या वेळी स.पो.नी.विशाल भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नायगाव तालुक्यातील पत्रकार बांधवांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास व्हॉईस मिडियाचे ५० च्या वर शिलेदार उपस्थित होते .यावेळी नुकतेच निधन झालेले पत्रकार मित्र सुभाष पेरकेवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



# सरोज मासुरकर यांचे निधन

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील श्रीमती सरोज मासुरकर - नाईक यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे मृत्यू समयी त्यांचे [ ९० ] वर्ष वय होते त्यांच्या पश्चात दोन भाऊ एक बहीण मुलगी जावई असा परिवार आहे. श्रीरामपूर येथील संत लूक हॉस्पिटलचे सेवा निवृत्त डॉ . अनिल मासुरकर यांच्या त्या भगिनी होत.

# फुलवळ येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा

## माजी सरपंच बालाजी देवकांबळे यांच्याकडून १५ वर्षांची परंपरा कायम

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे, याच भावनेतून फुलवळ ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य तथा माजी सरपंच बालाजी देवकांबळे यांनी आपली १५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा यंदाही जोपासली. 'दर्पण दिन' निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी फुलवळ सह कंधार येथील पत्रकारांचा शाल, श्रीफळ, हार आणि लेखणीचे प्रतीक म्हणून डायरी व पेन देऊन यथोचित गौरव केला.

बालाजी देवकांबळे हे गेल्या दीड दशकापासून न विसरता दरवर्षी पत्रकार दिनी हा स्तुत्य उपक्रम राबवत आहेत. समाजहितासाठी अहोरात्र झटणाऱ्या आणि अन्यायाला वाचा फोडणाऱ्या पत्रकारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते




हा सोहळा आयोजित करतात. ग्रामीण भागातील समस्यांना शासन-दरबारी मांडण्याचे काम पत्रकार करतात, त्यांच्या या कार्याचे मोल मोठे असल्याचे मत यावेळी देवकांबळे यांनी व्यक्त केले.

या सन्मानाबद्दल पत्रकारांनी कृतज्ञता व्यक्त केली. "राजकारणात असूनही सलग १५ वर्षे सामाजिक बांधिलकीतून पत्रकारांचा असा सन्मान करणारे व्यक्तिमत्व दुर्मिळ आहे," अशा भावना यावेळी उपस्थित पत्रकारांनी बोलून दाखवल्या. या छोटेखानी पण देखण्या सोहळ्यासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. देवकांबळे यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




ठाणे : दिव्यातील प्रभाग क्र. २८ मधील भाजप प्रेणित असलेल्या उमेदवार रेश्मा नरेश पवार यांना महायुतीच्या निर्णयामुळे भाजपकडून उमेदवारी नाकारल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रींगणात उतरल्या असून शैक्षणिक क्षेत्रात अनेक लोकांभिमुख कामे करत असून रेश्मा पवार यांचा आपल्या विभागातील प्राचाराचा वेग वाढू लागला असून विरोधकांना चपराक मिळण्याची शक्यता आहे. प्रभागातून त्यांच्या विजयाची नांदी दिसून येत आहे. ( फोटो - संतोष पडवळ )



अर्धापूर शहरातील बँक ऑफ इंडिया बॅकेचे शाखाधिकारी विनोद मुजमुले यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार निळकंठराव पाटील मदने, पत्रकार सखाराम क्षीरसागर, कार्याध्यक्ष उदयकुमार गुंजकर यांचा सत्कार करून डायरी व पेन भेट देऊन दर्पण दिन साजरा करण्यात आला.यावेळी बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी,पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# “रंगोली सारी” चा मालक रसिक बोरीचा याची घृणास्पद कटकारस्थान उघड

## जैन समाजाचा तीव्र रोष तर तातडीच्या पोलिस कारवाईची मागणी.






**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे शहरात ओसवाल जैन समाजात सूडबुद्धीने खालच्या पातळीवर जाऊन बदनामी करण्याचा प्रकार समोर आल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. श्री. ठाणे वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे उपाध्यक्ष वसणजी लखमशी कारीया (वय ६३) यांच्या सन्मान, प्रतिष्ठा व सामाजिक अस्तित्वावर घाला घालण्यासाठी रंगोली सारीचा मालक रसिक प्रेमजी बोरीचा (वय ५३) आणि त्याच्या साथीदारांनी सुनियोजित कट रचल्याचा गंभीर आरोप होत आहे. एका प्रतिष्ठित समाजनेत्याचा फोटो मॉर्फ करून एका महिलेसोबत अश्लील अवस्थेत दाखवणारा बनावट व्हिडीओ तयार करण्यात आला. या व्हिडीओसोबत बदनामीकारक मजकूर जोडून, बनावट सिमकार्ड व वेगवेगळ्या मोबाईल नंबरवरून समाजात व्हायरल करण्यात आला.

हा प्रकार केवळ गुन्हा नाही, तर समाजाच्या प्रतिष्ठेवर झालेला डिजिटल अत्याचार असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे. प्रकरणी समाजहितासाठी वसणजी कारीया यांनी रसिक बोरीचा याच्यावर झालेल्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर संघातून राजीनामा देण्याची मागणी केली होती. त्यानंतर १२ कारीया बांधवांनी लेखी तक्रार दिली, संघाची बैठक झाली, चर्चा झाली—मात्र याच घटनेनंतर सूडाची ठिणगी पेटली आणि अखेर हा नीच प्रकार करण्यात आल्याचा आरोप आहे.

### थेट प्रश्न, थेट मागण्या

- प्रतिष्ठित समाजनेत्यांवर डिजिटल ब्लॅकमेलिंग का?
- आरोपी अजूनही मोकाट का?
- सायबर विभाग किती कठोर पावले उचलणार?
- धार्मिक संघटनांत गुन्हेगारांना संरक्षण देणारे कोण?

या कटात केवळ एक व्यक्ती नव्हे, तर टोळी कार्यरत असल्याचा दावा करण्यात येत आहे. कांतीलाल जुठालाल बोरीचा, मुरजी जुठालाल बोरीचा, समुभा गोवुबा जाडेजा, राहुभा गोडजी भाटी यांची नावे समोर येत असून, सर्वांनी मिळून बदनामीचे हे विषारी कारस्थान रचल्याचा गंभीर आरोप आहे. हा केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रतिष्ठेवरचा घाव आहे."

"समाजात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे." "दोषींना तातडीने अटक होणार का? कठोर शिक्षा दिली जाणार का?" असे संतप्त प्रश्न समाजातून उपस्थित होत आहेत.

ठाण्यातील जैन समाज पेटला आहे. न्यायासाठी जोरदार मागणी होत असून, पोलिसांवर कठोर कारवाईचा दबाव वाढत चालला आहे. फिर्यादी व साक्षीदारांना समन्स देण्याची प्रक्रिया सुरू असून, तपास वेगाने सुरू असल्याची माहिती आहे.

# ओतुर ज्युनिअर केजी ते १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## शालेय स्नेहसंमेलनात कला-संस्कृतीचा जागर

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

ओतूर येथील माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडले. या स्नेहसंमेलनात ज्युनिअर केजी ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, त्यामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक नाट्यप्रयोग सादर केले. लहानग्यांच्या निरागस अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली, तर मोठ्या विद्यार्थ्यांच्या सशक्त संवादांनी समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला. याशिवाय गाणी, समूहगीत, नृत्य, भाषणे आदी कार्यक्रमांनी स्नेहसंमेलनाला रंगत आणली. विशेष बाब म्हणजे विद्यार्थिनींनी विविध भाषांमध्ये सादरीकरण करून आपली कलागुणांची झलक दाखवली. मराठीसह इतर भाषांतील गीत-नाट्य व भाषणांनी बहुभाषिक संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले. विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे पालक व मान्यवरांनी विशेष कौतुक केले.या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षपद मा. श्रीमती हेमलताताई बिडकर (अध्यक्षा, डांग सेवा मंडळ, नाशिक) यांनी भूषवले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळाली. उपस्थित शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,ओतूर गावांसह परीसरातील गावांचे सर्वच सरपंच उपसरपंच सदस्य, प्रगतीशील शेतकरी,शेत मजूर,सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्ष कार्यकर्ते, पत्रकार ,शाळेचे प्राचार्य व मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून आत्मविश्वास वाढीस लागला आहे, अशी भावना पालकांनी व्यक्त केली.एकूणच, ओतूर येथील शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन हे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा स्नेहबंध अधिक दृढ करणारे आणि शिक्षणासोबत संस्कृतीची जपणूक करणारे ठरले.

# बाजार समिती मार्फत शेतमाल तारण योजना सुरु करा

**वैजापूर: (समर्थ गांवकरी)**

शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने 'शेतमाल तारण योजना सुरु करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गट ) पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापु ठुबे यांती प केली सभापती रामहारीबापू जाधव व उपसभापती शिवकन्या पवार यांना दिलेल्या निवेदनात म्हनटले आहे. वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितींतर्गत शेतकरी हितासाठी शेतमाल तारण योजना सुरू करण्यात यावी, याचा सर्वार्थाने विचार करून लवकरच निर्णय घ्यावा. तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या विविध शेतमालास अपेक्षित दर मिळत नसुन शेतमालाचे भावात कायम पडझड होत असते त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक होते. आर्थिक अडचणी परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतमाल तत्काळ विक्री करावा लागू नये व योग्य दर मिळेपर्यंत शेतमाल साठवून ठेवता यावा, यासाठी आपल्या बाजार समितीने शेतमाल तारण योजनेला सुरूवात करावी जेणे करून शेतकरी आपला शेतमाल तारणा ठेवून आर्थिक गरज पूर्ण करेल. जेव्हा आपल्या अन्नधान्याला योग्य भाव येईल तेव्हा बाजारात विक्री करू शकतो. यासाठी शेतमाल तारण योजना अत्यंत उपयुक्त व गरजेची आहे. ही योजना शेतकऱ्यांच्या हिताची असुन नफा मिळवुन देणारा आहे. शेतमालाचे भाव सतत कमी जास्त होत असल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कमी दरात आपला शेतमाल विकावा लागत आहे. यासाठी बाजार समितीमार्फत शेतमाल तारण योजना जर त्वरित सुरू केली तर सर्वसामान्य शेतकऱ्यांना त्यांच्या फायदा होईल. शेतकरी शेतमाल तारण योजना सुरू केल्यानंतर शेतकऱ्यांना शेतमाल तारण ठेवून पैसे भेटतील त्यातुन शेतकऱ्यांची आर्थिक गरज भागणार आहे. जेव्हा शेतकऱ्याच्या शेतमालाला चांगला भाव येईल तेव्हा तो आपलं धान्य चांगल्या भावात विकून दोन पैसे जास्तीचे मिळवु शकतो. तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीने तात्काळ शेतमाल तारण योजना सुरू करावी. असे निवेदनात म्हणटले आहे.



# स्नेहालयची अनुभूती सायकल यात्रा; जामखेड होणार दाखल सद्भावनेचा करणार जागर

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

समाजात वाढत चाललेला द्वेष,संशय आणि हिंसेला छेद देत माणुसकी,अहिंसा व धर्मनिरपेक्षता,बालविवाह प्रतिबंध'चा संदेश देणारी स्नेहालय संस्थेची महाराष्ट्रव्यापी 'सद्भावना सायकल यात्रा क्र.११' दि.०८ व ०९ जानेवारी ला जामखेड तालुक्यातून मार्गक्रमण करणार आहे.नांदेड (मराठवाडा) येथून सुरू झालेली ही सायकल यात्रा १२ जानेवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अहिल्यानगर येथे समारोपाला येणार आहे. नांदेड ते स्नेहालय अहिल्यानगर असा एकूण ८१७ किलोमीटरचा प्रदीर्घ प्रवास करणारी ही यात्रा मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्हे,तालुके आणि ग्रामीण भागातून जात आहे. जामखेड परिसर व तालुक्यात या यात्रेच्या माध्यमातून सामाजिक सलोखा,राष्ट्रीय एकात्मता,मानवी मूल्ये व युवकांचे प्रबोधन यावर भर देण्यात येणार आहे. या यात्रेत ५० सायकलस्वार युवक-युवती सहभागी असून दररोज ७० ते ९० किलोमीटरचा प्रवास करत विविध गावांमध्ये युवक संवाद,महाविद्यालयीन चर्चासत्रे, सामाजिक संस्थांशी बैठक व नागरिकांशी थेट संवाद साधला जात आहे.जामखेड व परिसरातील सामाजिक कार्यकर्ते,विद्यार्थी,स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा या उपक्रमाला सक्रिय प्रतिसाद मिळत आहे.छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले,क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा गांधी,स्वामी विवेकानंद,संत तुकाराम,गुरु नानक यांसारख्या थोर समाजसुधारकांच्या मानवतावादी विचारांचा वारसा पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे संचालक हनिफ शेख,प्रवीण कदम व आयोजकांनी सांगितले.ही सायकल यात्रा कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसून पूर्णतः सामाजिक व लोकचळवळीच्या स्वरूपाची आहे. जामखेडसारख्या ग्रामीण भागात युवकांमध्ये सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी ही यात्रा प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत सामाजिक क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले आहे.अहिल्यानगर येथे होणाऱ्या समारोप कार्यक्रमात विविध सामाजिक संस्था,युवक संघटना आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत असे प्रकल्प समन्वयक विकास सुतार यांनी सांगितले.

# गावच हरवत चाललेल गावपण पुन्हा झालय तयार!

**चांदा : (समर्थ गांवकरी)**

सध्याच्या डिजिटल युगात लोकांना एकमेकांशी बोलायलाही वेळ नाही . मोबाईल ,टीव्हीच्या काळात प्राचीन संस्कृती लोप पावत चालली आहे . मात्र नेवासा तालुक्यातील चांदा गावाने पुन्हा एकदा गावचं गावपण जपत बंद पडलेली चावडी [पार] पुन्हा एकदा नव्या रंगात उभारून ज्येष्ठांसाठीच गावपण जपलं आहे. या कामाची सर्वत्र कौतुक होत आहे .नेवासा तालुक्यातील चांदा येथील अनेक पिढ्यांपासून असलेला पार [ चावडी] काही वर्षापासून केर कचऱ्यांच्या ठिगाऱ्यात झाकून गेला होता. जुन्या काळात पाराला [चावडीला] अनन्य साधारण महत्त्व होते.

# शेख आयेशा यांचा मुंबईत वर्षा निवासस्थानी वाढदिवस साजरा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बीड येथील लोकजगतच्या संपादक शेख आयेशा यांनी अतिशय कमी कालावधीत पत्रकारिता क्षेत्रात आणि तृतीयपंथीयांसह सामाजिक कार्यात सुरू केलेले कार्य उल्लेखनीय आहे. यामुळेच आज मी माझ्या एका चांगल्या जिवलग मैत्रिणीचा वाढदिवस वर्षा निवासस्थानी साजरा केला असे प्रतिपादन वाढदिवसानंतर सौ. अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा देताना व्यक्त केले. मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या शासकीय वर्षा बंगल्यावर 1 जानेवारी रोजी पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस मुख्यमंत्री यांच्या सुविधा पत्नी तथा बँकर, सुप्रसिद्ध गायिका, अभिनेत्री आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या सौ.अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय वर्षा या बंगल्यावर वाढदिवस साजरा केला.



यावेळी त्यांनी पत्रकार शेख आयेशा यांना शुभेच्छा देताना म्हटले की, तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणावर आणि अल्पसंख्याक समाजातील अन्यायग्रस्त महिलांना न्याय देण्यासाठी सुरू केलेला लढा निश्चितच कौतुकास्पद आहे. मला देखील सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांबद्दल कौतुक वाटते. एका ग्रामीण भागातून थेट मुंबई पर्यंत माझ्यासोबत त्यांनी जो विश्वास संपादन केला हि बाब नक्कीच कौतुकास्पद आहे. भविष्यात त्यांच्या आश्रय सेवाभावी संस्थेला आम्ही सामाजिक कार्य करत असलेल्या दिव्याज फाउंडेशन अंतर्गत निश्चित तृतीयपंथीयांसह महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करू असा विश्वास व्यक्त केला. वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि तोंड गोड करून वाढदिवस त्यांनी मोठ्या आनंदाने साजरा केला. वाढदिवसानिमित्त खास निमंत्रित करून कुठलेही नाते संबंध नसतानाही एका ग्रामीण भागातील वृत्तपत्र सृष्टीत काम करणाऱ्या महिलेला मैत्रिण म्हणून बोलावून पाहुण्यांनाही लाजवेल एवढे आदरातिथ्य करून आस्थेवायीकपणे केलेला संपूर्ण पाहुणचार नेत्रदीपक आणि स्वप्नवतच वाटत आहे. माझा माझ्यावरच विश्वास बसत नाही मी एक सामान्य कुटुंबातील अल्पसंख्याक समाजातील महिला असताना सुद्धा थेट मुख्यमंत्र्यांच्या सुविद्य पत्नीने माझा वाढदिवस मुख्यमंत्र्यांच्या शासकीय बंगल्यावर करावा हा माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय क्षण आहे अशा आपल्या भावना त्यांनी आनंदाश्रूनी व्यक्त केल्या.

# अलंकापुरीत पत्रकार दिन उत्साहात

- माऊलींच्या चरणी नतमस्तक होऊन पत्रकार संघाचा मुंबई दौरा मार्गस्थ

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाच्या वतीने 'पत्रकार दिना'चे औचित्य साधून तीर्थक्षेत्र अलंकापुरीत विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या पादुकांचे पूजन आणि सिद्धबेटावर वृक्ष संवर्धनाचा संकल्प करून पत्रकार बांधवांनी हा दिवस साजरा केला.

मंगलमय वातावरणात सकाळी ठीक ७ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या चल पादुकांची पूजा करण्यात आली. वेदमूर्ती प्रफुल्ल प्रसादे यांच्या पौरोहित्याखाली वेदघोषाच्या स्वरात हा विधी संपन्न झाला. यावेळी श्रींचे दर्शन घेऊन श्री गणेश मंदिर मंडप येथे आरती करण्यात आली. हुतात्मा राजगुरू पत्रकार संघ अध्यक्ष अर्जुन मेदनकर, जिल्हा प्रतिनिधी अमर गायकवाड यांनी उपक्रमाचे संयोजन केले. या वेळी पत्रकारांनी समाजहिता साठी आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेसाठी माऊलींकडे आशीर्वाद मागितले.



मंदिरातील पूजेनंतर सकाळी ८ वाजता सर्व पत्रकार बांधवांनी श्री संत लीला भूमी सिद्धबेट येथे भेट दिली. या ठिकाणी पवित्र अजानवृक्षाची पूजा करण्यात आली. सिद्धबेटाची पाहणी करतानाच निसर्ग संवर्धन आणि वृक्ष संगोपना बाबत उपस्थित मान्यवरांमध्ये सविस्तर चर्चा झाली. पत्रकारिता करतानाच सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पर्यावरण रक्षणासाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी अर्जुन मेदनकर यांनी व्यक्त केला. गेल्या चार वर्षा पासून सिद्धबेट येथे वृक्षारोपण, संवर्धन, पर्यावरण रक्षणाचे कार्य सुरू असून येथील हरित संपदा संवर्धन होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी उपस्थित सर्व पत्रकार बांधवांना आणि मान्यवरांना पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाच्या वतीने आलेल्या पाहुण्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. अलंकापुरीतील कार्यक्रम आटोपल्यानंतर सर्व मान्यवर आणि पत्रकार संघ पुढील नियोजित मुंबई दौऱ्यासाठी रवाना झाला. या उपक्रमा मुळे पत्रकारिते सोबतच अध्यात्म आणि पर्यावरण रक्षणाचा एक सुंदर संगम आळंदीत पाहायला मिळाला.

# शिवसेना जिल्हा प्रमुख पदी जाधव यांची फेरनिवड

**राहता : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उत्तर अहिल्यानगर जिल्हा प्रमुख पदी साकुरी येथील श्री जितेंद्र उर्फ पप्पू जाधव यांची फेरनिवड करण्यात आली आहे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे तसेच खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेने शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख श्री मंगेश चिवटे व श्री राम राऊत यांनी श्री जाधव यांची फेरनिवड केली आहे श्री जाधव यांनी उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांचे नेन्तृत्वाखाली सुरु असलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून आज पर्यंत राज्यातील अनेक गरजू व गरीब रुग्णांना रुग्णालय कामी मदत मिळवून दिली आहे व आजतागायत मदत मिळवून देत आहे.

# एचडीएफसी बँक स्मार्ट गेटवे पेमेंट मंचाचे सीबीडीसी (डिजिटल रुपया) चे एकत्रिकरण पूर्ण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एचडीएफसी बँके तर्फे आज रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (सीबीडीसी) या डिजिटल रुपयाचे (ई रुपी) चे त्यांचा ऑनलाईन मर्चंट पेमेंट मंच असलेल्या स्मार्ट गेटवे मध्ये एकत्रिकरण करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. आता या एकत्रिकरणामुळे व्यापाऱ्यांना आता त्यांच्या ग्राहकांना सुरक्षित, शून्य खर्चात आणि सॉव्हरेन वर आधारीत डिजिटल पेमेंटचा पर्याय हा एचडीएफसी बँकेच्या चेकआऊट पध्दतींमध्येही उपलब्ध झाला आहे.

या सुधारणे मुळे स्मार्टगेटवे चे व्यापारी आता डिजिटल रुपयांच्या स्वरुपात कोणत्याही खर्चाशिवाय पेमेंट स्विकारु शकतील. त्याच बरोबर सध्याच्या यूपीआय, कार्ड्स आणि नेट बँकिंगचा वापरही त्यांना करता येणार आहे.

या उपक्रमाच्या अंमलबजावणी मुळे एचडीएफसी बँकेचे डिजिटल फर्स्ट म्हणून असलेले स्थान अधिक सक्षम होऊन नाविन्य देण्याची वचनबध्दता वाढून कमी प्रमाणातील रोख व्यवहार करण्यास चालना मिळून सर्वसमावेशक डिजिटल अर्थव्यवस्था होउ शकेल.

ग्राहकांना आता अगदी लगेच आणि सुरक्षित पध्दतीचा अवलंब करुन डिजिटल पेमेंटचा समृध्द अनुभव प्राप्त करता येणार आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत एचडीएफसी बँके ने प्रायोगिक तत्वावर काम करणे सुरु केल्यापासून अंदाजे ८.४५ लाख नोंदणीकृत सीबीडीसी वॉलेट्स ना सेवा दिली असून त्यामध्ये दरमहा १३,००० ते १५,००० वॉलेट्सची वाढ होत आहे.

शून्य खर्चात वापर करणे शक्य असल्याने सीबीडीसी मध्ये व्यापाऱ्यांना भविष्यासाठी तयार, दलाल विरहीत पेमेंट पध्दती मिळाल्याने अगदी कमी खर्चात शाश्वततेने सुधारीत अशी पेमेंट पध्दती प्राप्त होते. ग्राहकांसाठी सुध्दा डिजिटल रुपया मुळे यूपीआय चा सोपेपणा, आरबीआयची डिजिटल करन्सी यांचा लाभ झाल्याने व्यवहार वेगाने, सुरक्षित आणि मोफत करता येतात.

सीबीडीसी चे व्यापाऱ्यांसाठी असलेल्या स्मार्ट गेटवे बरोबरच्या एकत्रिकरणा मुळे एचडीएफसी बँके तर्फे आणखी एक पेमेंटची पध्दत जोडण्यात यश मिळवले असून यामुळे सॉव्हरेन वर आधारीत डिजिटल करन्सीचा लाभ अधिकाधिक व्यावसायिकांना प्राप्त होऊ शकेल.

# सिनेपोलिस इंडिया तर्फे 'ब्लॉकबस्टर फूड फेस्टिव्हल'



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सिनेपोलिस इंडिया तर्फे ब्लॉकबस्टर फूड फेस्टिव्हल (बीएफएफ) या तीन महिन्यांच्या एफअँडबी मोहिमेची घोषणा करण्यात आली आहे. ही मोहीम १ जानेवारी २०२६ पासून देशभरातील सर्व सिनेपोलिस चित्रपटगृहांमध्ये सुरू झाली आहे. या उपक्रमांतर्गत २१ हून अधिक नवीन मेन्यू आयटम्स सादर करण्यात येणार असून फेस्टिव्हलच्या शेवटी सर्वाधिक लोकप्रिय ठरणारे पदार्थ फुव्हीजच्या कायमस्वरूपी मेनूमध्ये समाविष्ट केले जातील.ही मोहीम या वर्षाच्या सुरुवातीला सुरू करण्यात आलेल्या 'सिनेपोलिस इंडिया'च्या 'फुव्हीज' या फूड-अँड-मूव्हीज प्लॅटफॉर्मच्या पुढील टप्प्याची सुरुवात आहे.

# माध्यमातील बदलांकडे आशावादी दृष्टीने पाहण्याची गरज

## ज्येष्ठ पत्रकार शीतल पवार

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

माध्यमांमध्ये होत असणाऱ्या बदलांबाबत आपण प्रचंड सकारात्मक व आशावादी असल्याचे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार शीतल पवार यांनी केले. सध्या माध्यमात मोठे बदल होत आहेत.रचना बदलत आहे.व्यवस्थापन बदलत आहे. त्या मुळे नक्कीच काही गोष्टी आव्हानात्मक वाटतात.पण या बदलत संधी शोधणारा माणूस पत्रकारच आहे आणि तो उत्तम पद्धतीने बदलांशी जुळवून घेतो. त्या मुळे आपण या बदलांबाबत प्रचंड सकारात्मक व आशावादी असल्याचे शीतल पवार म्हणाल्या.

आज मंगळवारी पत्रकार दिनानिमित्त अकोले नगर पंचायत व अकोले पत्रकार यांच्या वतीने जेष्ठ पत्रकार शीतल पवार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे,उपनगराध्यक्ष शरदराव नवले, नगरसेवक विजय पवार, मुख्याधिकारी धनश्री पवार, जेष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर,श्रीनिवास रेणूकदास, अमोल वैद्य,विद्याचंद्र सातपुते, राजेंद्र मालुंजकर,दिनेश जोरवर,आकाश भालेराव, प्रदीप कदम,संकेत आवारी ,मनसे चे तालुकाध्यक्ष दत्ता नवले, रणजित शिंदे व नगरपंचायत चे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्या पुढे म्हणाल्या की, सोशल मीडियावर स्वातंत्र्य मिळाल्याने त्यात वाढ झाली आहे.आता सोशल मीडिया वर व्यक्त होणाऱ्यांना आपल्या वृत्तपत्रात जागा द्यावी लागणार आहे. मात्र वृत्तपत्रामध्ये जागेला मर्यादा येत असल्याने त्यांना डिजिटल मिडियावर जागा द्यावी लागणार आहे. असे असले तरी आता वर्तमानपत्र हातात घेऊन वाचणाऱ्यांची संख्या होत असली तरी इ पेपरचा खप वाढत आहे.ई पेपर वाचणाऱ्यांची संख्याही आता काही लाखात आहे.




पत्रकारांनी आता वेगळे लिखाण करण्याची गरज आहे त्यामुळे या बदलांमध्येही लोकांना चांगले वाचायला मिळेल. ही बाब ग्रामीण पत्रकारांच्या बाबतीत दिसून येते.त्यामुळे आपण काय वेगळ्या पद्धतीने देतो,आणि आपण ते माध्यम लोकांपर्यंत कसे पोहोचवतो हे महत्वाचे आहे.हे बदल वेगवेगळ्या फॉर्म मध्ये होताना दिसत आहे.आपण जास्तीत जास्त लोकाभिमुख होणे गरजेचे आहे. हे बदल फार वेगाने होत असून आपणास एक दोन वर्षात आपल्याला हे सर्व अनुभवायला मिळेल असे त्यांनी सांगितले.

धुळे सारख्या छोट्या गावातून पुणे पर्यंतच्या आपल्या प्रवासाचे काहीं अनुभवही त्यांनी यावेळी सांगितले. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी मनमोकळे पणाने उत्तरे दिली.

प्रास्ताविक व स्वागत अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य यांनी केले तर नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांनी आभार मानले.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशासनच आले 'सलाईनवर'

**ए.म.ओ. संघटना आक्रमक; आंदोलनाचा इशारा**



**तामसा: (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षमपणे चालविण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचेच अनेक महत्त्वाचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने संपूर्ण जिल्हा आरोग्य प्रशासनच 'सलाईनवर' असल्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या विविध प्रशासकीय अडचणींकडे जिल्हा आरोग्य प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात येत असून, या प्रश्नांच्या निराकरणासाठी ए.एम.ओ. संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. या विषयावर जिल्हा आरोग्य अधिकारी काय भूमिका घेतात की दरवेळी सारखे निवेदन घेऊन बाजूला ठेवत वेळ पुढे ढकलत नेतात हे पाहणे तितकेच गरजेचे आहे...

जिल्ह्यातील तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा पुस्तके अद्ययावत करणे, कर्मचाऱ्यांच्या रजाप्रकरणांचा तातडीने निपटारा करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन नियमित करणे, तसेच कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल महापार प्रणालीवर अद्ययावत करून त्याच्या प्रती संबंधितांना उपलब्ध करून देणे, या प्रमुख मागण्या संघटनेने मांडल्या आहेत. याशिवाय, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित कामांसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक मागणी होऊ नये, वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रवास भत्ता मंजूर करण्यात यावा, शासनाने मान्य केलेल्या पी.आय.पी.ची माहिती वेळेत मिळावी, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निधी विहित कालावधीत मंजूर करावा, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर रुग्णांसाठी आवश्यक औषधसाठा व साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

"या सर्व अडीअडचणींवर तोडगा काढण्यासाठी कर्मचाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करून प्रश्नांचे तात्काळ निराकरण करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. याबाबत प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास संघटनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय मुरमुरे यांनी दिला आहे.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनावर डॉ. प्रकाश गुरुतवाड, हनुमंत पाटील, के. पी. गायकवाड, संजय कासराळीकर, श्रीकांत देसाई, आकाश देशमुख, गणपत वाडेकर, दीपक कदम, प्रवीण मुंडे, संदेश राठोड, गजानन काळे आदी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत."

# कौठा येथे आजपासून तुलसीरामायण कथा

- ह.भ.प. संजयमहाराज पाचपोर कथा सांगणार

**श्रीरामकथे निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन**

आठ दिवस चालणाऱ्या श्रीराम कथेनिमित्त कौठा येथील श्री राम मंदिरा समोरील दररोज विविध कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा,मोफत नेत्र तपासणी शिबीर, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार तपासणी शिबिर, व माहेर गौरव सन्मान सोहळा तसेच उत्कृष्ट कलागुण असलेल्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. अशी माहिती आयोजक मंडळी यांनी दिली आहे.

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील भिमानदी काठावरील श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र अशा कौठा गावात श्रीराम जन्मभूमी अयोध्या रामलल्ला प्राणप्रतिष्ठा स्थापनेच्या वर्षपूर्ती सोहळ्या निमित्त आज गुरुवार दि.8 जानेवारी 2026 ते 15 जानेवारी 2026 पर्यत आठ दिवस संगित तुळसी रामायण कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.त्या निमित्त विदर्भरत्न ह.भ.प. रामायणाचार्य संजयमहाराज पाचपोर यांची कथा श्रवण होणार आहे. तालुक्यातील कौठा गावात आठ दिवस चालणाऱ्या रामकथा ऐकण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून



माजी मंत्री बबनराव पाचपुते, विधानसभा सभापती प्रा.राम शिंदे, खासदार निलेशजी लंके,गोसेवा आयोगाचे राज्यध्यक्ष शेखरजी मुंदडा,दौंडचे आमदार राहुल कुल,माजी खासदार डॉ. सुजय विखे, कर्जतचे आमदार रोहित पवार, नगरचे आमदार संग्राम जगताप, माजी आमदार राहुल जगताप, राजेंद्र नागवडे, बाबासाहेब भोस, यांच्यासह नामवंत किर्तनकार महाराज मंडळी,तसेच उद्योजक, व्यवसायिक, व्यापारी असे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आठ दिवस चालणारी संपूर्ण रामकथा हि श्रीराम मंदिर कौठा येथील प्रांगणात सांयकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत चालणार आहे. त्यानंतर रामकथेसाठी आलेल्या भक्तांना आठ दिवस दानशुर व्यक्ती कडून अन्नदान होणार आहे. तरी श्रीराम कथा ऐकून आपल्या जीवनात बदल घडविण्यासाठी मोठ्या संख्येने आपण उपस्थित रहावे असे आवाहन श्रीराम देवस्थान संयोजक कमिटीने केले आहे.

# पत्रकार दिनानिमित्त मिठाई वाटप



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी दि.६ जानेवारी रोजी पत्रकार संघातील सदस्यांना मिठाई वाटप करुण तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया संघाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे यांचा सत्कार करुन पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुण पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे होते. यावेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांच्या वतीने सर्व पत्रकारांना मिठाईचे वाटप इलेक्ट्रॉनिक मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पत्रकार आनंद भुकन, पत्रकार सागर आतकर, पत्रकार संदीप वैरागर, प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल, मार्गदर्शक ॲड.गणेश लाळगे, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग आदी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड यावेळी म्हणाले आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी १८ व्या शतकात पत्रकारिता करताना स्वातंत्र्यसाठी लोकप्रबोधन केले म्हणून इंग्रज हटाव मोहिम फत्ते झाली. सध्याच्या युगात पत्रकारिता करताना भ्रष्टाचारचा राक्षस हटवीण्यासाठी पत्रकारिता करण्याची गरज आहे.

# शासन सर्वतोपरी सहकार्य करणार

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. मंत्रालयात राज्य ग्रंथालय परिषदेची बैठक झाली यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयानुसार १६ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. राज्य ग्रंथालय परिषद ही ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनास सल्ला देणारी प्रमुख परिषद आहे. ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार असल्याचे तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी सांगितले.

# पत्रकार दिनानिमित्त मिठाई वाटप

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज या ठिकाणी दि.६ जानेवारी रोजी पत्रकार संघातील सदस्यांना मिठाई वाटप करुण तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया संघाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे यांचा सत्कार करुन पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुण पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे होते.

यावेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाचपुते यांच्या वतीने सर्व पत्रकारांना मिठाईचे वाटप इलेक्ट्रॉनिक मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पत्रकार आनंद भुकन, पत्रकार सागर आतकर, पत्रकार संदीप वैरागर, प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल, मार्गदर्शक ॲड.गणेश लाळगे, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग आदी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड यावेळी म्हणाले आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी १८ व्या शतकात पत्रकारिता करताना स्वातंत्र्यसाठी लोकप्रबोधन केले म्हणून इंग्रज हटाव मोहिम फत्ते झाली. सध्याच्या युगात पत्रकारिता करताना भ्रष्टाचारचा राक्षस हटवीण्यासाठी पत्रकारिता करण्याची गरज आहे. यासाठी सामाजिक प्रबोधन करण्याची गरज असून पत्रकारांना यासाठी शासकीय संरक्षण मिळण्याची गरज आहे.

मात्र सरकारने यासाठी लोकसभा,राज्यसभा यामध्ये विधेयक मंजूर करुण पत्रकारांना संरक्षण मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी केले. शेवटी पत्रकार आनंद भुकन व पत्रकार सागर आतकर यांनी केले.

# जो हनुमानाची उपासना करतो त्यांच्या जीवनात कोणते संकट राहत नाही

- गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज यांचे प्रतिपादन
- वैष्णवी भजनी मंडळाच्या आयोजीत श्री हनुमान कर्थेस (चरीत्र) उस्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

देवाच्या भक्ताची महिमा अशी आहे की देवापेक्षाही भक्त श्रेष्ठ मानला जातो समुद्र पार करण्याकरीता प्रभु रामचंद्राना सेतू बांधावा लागला सेतूने तीन दिवस पूजाअर्चा केली परंतू मार्ग दिला नाही, श्री हनुमान सेतू पार करायला परीश्रम पडले नाही. केवळ राम नामाच्या साहाय्याने झाले कोणतेही दुर्गम असे काम हनुमानजी केवळ रामनामाच्या आधारे करू शकतो जो देवाला सहाय्यता करतो अडचणाच्या वेळी मदत करतो तो आपल्याला अडचणाला कामाला येणार नाही का जो हनुमानाची उपासना करतो त्यांच्या जीवनात कोणते संकट राहत नाही असे प्रतिपादन गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज यांनी केले.

लालटाकी येथील खाकीदास मठात वैष्णवी भजनी मंडळाच्या आयोजीत श्री हनुमान कथेचे (चरीत्र) निरूपण गौडीया वैष्णवाचार्य युगलशरण महाराज हे करत आहेत. युगलशरण महाराजांनी हनुमानाच्या बाललिला सांगताना लहानपणी हनुमानाने सूर्य गिळला होता यांची कथा सांगितली त्यानंतर मिळालेले वरदानाबाबत सांगितले की हनुमान हा वज्राचा प्रहाराने काही होउ शकत नाही तसेच तो चिराउ आहे यावेळी भजन म्हणताना दुनिया मे देव हजारो है बजरंग बली, क्या कहना इनके भक्ती क्या कहना इनके शक्ती क्या कहना.

हनुमानाच्या बाललिला बददल सांगतात की लहानपणी ऋषीमुनी धार्मिक विधी करताना त्यांना हनुमान मदत करायला जायचे परंतू हनुमान हे बलशाली असल्याने ते सर्व उलट होत होते त्यामुळे ऋषीमुनी त्यांना शाप दिला की तु तुचे बल विसरशील जोपर्यत ते तुला कोणी स्मरण करणार नाही तोपर्यत. यावेळी माता अंजनाने हनुमान सांगितले महीमा भक्ती की तुम्हारी शक्ती की दुनिया भी गाती चली हो जय जय जय बजरंग बली हनुमान हे ज्ञान मिळवण्यासाठी सूर्यनारायणाकडे गेले त्यावेळी सूर्यनारायण म्हटले की माझा रथ अखंड फिरत असतो त्यामुळे तुला माझ्याबरोबर फिरावे लागेल त्यावर हनुमानजीने म्हटले मला मान्य आहे सूर्यनारायणाला पाठ न दाखवता त्यांनी ज्ञान ग्रहण केले त्यामुळे आपणही देव, संत, गुरूजी यांना कधीही पाठ दाखवू नये कधीही याठिकाणी सेल्फी काढू नये हा मर्यादा शिष्टाचार आहे जे देवाच्या हातात आहे, त्यांनी घाबरायचे कारण नाही. जो देवाला सोडले त्याला वाली कोण आहे हेच हनुमानाच्या कथेत समजते जेथे संपूण समर्पण आहे भीतीचे कोणतेच कारण नाही. तुलसीदास हनुमानाच्या बाललिलेचे वर्णन करताना सांगितले की, हनुमान हा जीवनातील प्रत्येक संकटात स्वत: आपला सहारा बनतो.

# २६ एप्रिल रोजी शिष्यवृत्ती परीक्षा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) 26 एप्रिल 2026 रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in आणि https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. शासनमान्य शाळांमधून 2025-26 या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व सातवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

# सायकलिंग खेळासाठी राज्यस्तरीय निवड चाचणी

## १४-१५ वयोगटातील खेळाडूंना सुवर्णसंधी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्र व सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांच्या मार्गदर्शनाखाली सायकलिंग खेळासाठी विविध क्रीडा प्रकारांची निवड चाचणी घेण्यात येणार आहे.ही निवड प्रक्रिया रोड सायकलिंग,ट्रॅक सायकलिंग व माऊंटन बाईक (एम.टी.बी.) या प्रकारांसाठी असून १४-१५ वर्षे वयोगटातील (जन्म २०११ व २०१२) मुले व मुली यांच्यासाठी शारीरिक व मैदानी चाचणी घेतली जाणार आहे.

या निवड चाचणीत मुलांसाठी १६०० मीटर धावणे, व्हर्टिकल जंप व ब्रॉड जंप,तर मुलींसाठी ८०० मीटर धावणे,व्हर्टिकल जंप व ब्रॉड जंप अशा चाचण्या घेण्यात येणार आहेत.या चाचणीच्या आधारे पात्र खेळाडूंची निवड करण्यात येईल.

संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडूंना या निवड चाचणीत सहभागी होता येणार असल्याचे आवाहन सायकलिंग आसोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा.संजय साठे यांनी केले आहे.ही निवड प्रक्रिया दि.१० व ११ जानेवारी २०२६ रोजी वाडिया पार्क क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रतिनिधी सुदाम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

या चाचणीत निवड झालेल्या खेळाडूंना दिल्ली येथे स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडिया (SAI) यांच्या सहकायनि राष्ट्रीय पातळीवरील निवड चाचणीत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या सहभागी खेळाडूंसाठी निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

निवड चाचणीसाठी शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र,जन्म दाखला, आधार कार्ड व एक पासपोर्ट साईज फोटो आवश्यक आहे.अशी माहिती ॲड.विक्रम रोठे अध्यक्ष, सचिव प्रा.संजय साठे, खजिनदार भिकन अंबे यांनी दिली आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क- प्रा.संजय साठे (मो.7972189670), प्रा.साईनाथ थोरात (मो. 7410018100) यांच्याशी संपर्क साधावा.

# व्यक्तिरेखा साकारताना एक वेगळाच आनंद मिळतो

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



झी टीव्हीवरील नवीन कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' ही भारतातील मध्यमवर्गीय संयुक्त कुटुंबांच्या दैनंदिन वास्तविकतेशी जोडलेली कथा प्रेक्षकांसमोर आणते. स्वप्ने, जबाबदाऱ्या आणि एकत्रितपणाच्या भावनिक पार्श्वभूमीवर आधारित ही मालिका अनेक परिवारांच्या शांतपणे आकार घेत असलेल्या आकांक्षांना आणि विशेषतः स्वतःचे घर मिळवण्याची आणि मुलांच्या भविष्यासाठी स्थैर्य निर्माण करण्याची आशेला दाखवते. ही कथा लक्ष्मी आणि श्रीनिवास या दांपत्याभोवती फिरते. त्यांनी तब्बल 35 वर्षे भाड्याच्या घरात घालवली असून त्यांच्या मनात दोन मोठी स्वप्ने आहेत, एक म्हणजे स्वतःचे घर घेणे आणि दुसरे म्हणजे आपल्या मुलांना सुखाने स्थिरस्थावर झालेले पाहणे. या दीर्घकाळ जपलेल्या स्वप्नांच्या दिशेने ते पावले टाकू लागतात, तेव्हा आयुष्य त्यांच्यासमोर अनपेक्षित आव्हाने उभी करते आणि नाती, संयम आणि कुटुंबाचा खरा अर्थ यांची कसोटी पाहते. या प्रवासात एक नवा भावनिक रंग भरत, 'लक्ष्मी निवास' मालिकेत अक्षिता मुदगल राधिका या भूमिकेत दिसणार आहे.

# चौथा स्तंभ भक्कम असल्याने समाजाभिमुख कामांना चालना

**प्राचार्य अंकुश अवघडे**



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ भक्कम असल्याने समाजाभिमुख कामांना चालना मिळाली असून पत्रकारीतेच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी चालना मिळाली असल्याचे प्रतिपादन मुलिका देवी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे यांनी व्यक्त केले आहे. विद्यालयात बुधवार दि.७ रोजी पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्राचार्य अंकुश अवघडे हे अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुण त्यांना अभिवादन करीत उपस्थीतांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड, प्राध्यापक पाडळकर,

ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय उनवणे, रामचंद्र महाराज सुपेकर, भास्करराव कवाद, अनिल चौधरी, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, सागर आतकर, संदीप गाडे, संपत वैरागर, जयसिंग हरेल, स्कूल कमीटीचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, उपाध्यक्ष तथा पठारवाडी गावचे उपसरपंच दौलतराव सुपेकर,

यावेळी विद्यालयाचे शिक्षक, महेबुब इनामदार सर, सबाजी बेलोटे,सुधीर धानापुणे , भास्कर काकडे , अरुण काळे, धनंजय खोसे, सुनील औटी,श्रीम.पुष्पा वराळ,श्रीम संगीता दिघे,श्रीम. अनिता काळे,श्रीम.ज्योती पोटे,श्रीम.प्रिया लहारे ,श्रीम बालिका सोनवणे, अनिल हारदे, राहुल भालेकर, गणेश बारामते दारकू खोडदे, अमोल खिलारी, शिवाजी गुंजाळ, श्रीम सुनताज इनामदार, बाबाजी शिंदे ,दादासाहेब ठवाळ, शिक्षकेतर कर्मचारी श्री सुधाकर शेळके,श्री भाऊसाहेब लामखडे, श्रीम पूनम शिंदे आदी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य अवघडे यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून या भागातील पत्रकारांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रात काम करताना गाव विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. विशेष करून शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देताना विद्यालयाच्या बातम्या प्रसिद्ध करताना या भागातील विद्यार्थ्यांना याचा कशाप्रकारे फायदा होईल यासाठी कार्यरत राहिले आहे. आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना जी पत्रकारिता ज्ञात होती त्याप्रमाणे अनुकरण करीत आजच्या पत्रकारांनी समाजाभिमुख कामांना चालना देऊन काम केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक रामचंद्र महाराज सुपेकर तसेच ज्येष्ठ शिक्षक मेहबूब इनामदार यांनी गेली दोनशे वर्षातील पत्रकारीतेचा इतिहास सांगताना इंग्रज सरकार ते आपले सरकार यातील फरक तसेच आजच्या पत्रकारीतेतील बदल याविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थित पत्रकारांचा विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे, उपप्राचार्य मोकळे सर, पर्यवेक्षक लक्ष्मणराव झंजाड, ज्येष्ठ शिक्षक मेहबूब इनामदार तसेच प्राध्यापक पाडळकर सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेहबूब इनामदार यांनी केले. शेवटी काळे सर यांनी आभार मानले.

# शिक्षणाचे रोपटे आज वटवृक्षात : राम शिंदे साहेब



**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे साहेब यांची श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सदिच्छा भेट

महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे साहेब यांनी बुधवार, दिनांक 7 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. या भेटीप्रसंगी महाविद्यालय परिसरात उत्साहाचे व भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

मा. ना. प्रा. राम शिंदे साहेब यांचे स्वागत अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधा वाहिनी नागवडे, युवा नेते श्री. दिग्विजय नागवडे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ तसेच श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे विश्वस्त उपस्थित होते. तसेच सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे तालुका दूध उत्पादक संघांचे संचालक श्री कृष्णा नागवडे उपस्थित होते.

आपल्या मनोगतात मा. ना. प्रा. राम शिंदे साहेब यांनी आपल्या जीवनातील संघर्षमय काळाची भावनिक आठवण करून दिली. "अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मी या महाविद्यालयात शिक्षण घेतले. त्या काळात महाविद्यालयच्या वस्तीगृहात ज्या मावशींनी मला प्रेमाने जेवण दिले, त्या मावशींची आठवण आजही मनात ताजी आहे. तसेच श्रद्धेय बापूंनी कधीही घरची आठवण होऊ दिली नाही," खिशात पैसे नसतानाही शिक्षण निम्म्यातून सोडले नाही कारण ह्याच महाविद्यालयाचा आधार होता असेही ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी, "श्रद्धेय बापूंनी लावलेले हे महाविद्यालयीन शिक्षणाचे रोपटे आज संस्थेचे अध्यक्ष श्री राजेंद्रदादा नागवडे यांच्यामुळे एका भव्य वटवृक्षात रूपांतर झाले आहे, याचा मला विशेष अभिमान आहे," असे गौरवोद्गार काढले.

महाविद्यालयाला नॅक (NAAC) मानांकनात A+ श्रेणी प्राप्त झाल्याबद्दल मा. ना. प्रा. राम शिंदे साहेब यांनी संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा नागवडे, सर्व विश्वस्त, निरीक्षक तसेच प्राचार्य डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी यांचे विशेष कौतुक केले.

"माझ्या जडण-घडणीमध्ये या महाविद्यालयाचा मोलाचा वाटा आहे. आज मी जे काही आहे, त्यामागे या संस्थेचे आणि येथील शिक्षकांचे मोठे योगदान आहे," असे सांगत त्यांनी महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या भेटीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्या काळातील मा. ना. प्रा. राम शिंदे साहेबांचे वर्गमित्र त्यांना भेटण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. त्यामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि स्मरणीय स्वरूप प्राप्त झाले.

या भेटीने महाविद्यालयाच्या इतिहासात एक गौरवशाली आणि प्रेरणादायी क्षण नोंदविला गेला असून, विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# महापालिका निवडणुकीत भानुदास कोतकर प्रचारात सक्रिय होताच नगरच्या राजकारणात खळबळ!



**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत केडगावच्या ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर हे पुन्हा एकदा प्रचाराच्या मैदानात सक्रिय झाले आहेत.

गेल्या तीन-चार दिवसांपासून काही कारणांमुळे प्रचारापासून अलिप्त असलेले कोतकर अचानक सक्रिय झाल्याने केडगावच्या राजकीय समीकरणांत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भानुदास कोतकर हे केडगावच्या राजकारणातील एक केंद्रबिंदू मानले जातात. कोतकर यांनी थेट शाहूनगर परिसरात मतदारांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या यारी एन्ट्रीमुळे सुस्तावलेल्या कार्यकर्त्यांमध्ये नवे चैतन्य संचारले असून, प्रचाराची गती आता अनेक पटीने वाढली आहे.

यावेळच्या निवडणुकीत भानुदास कोतकर यांनी प्रभाग क्रमांक १६ आणि १७ मध्ये आपले प्रबळ उमेदवार मैदानात उतरवले आहेत. कोतकर स्वतः मैदानात उतरून व्यूहरचना आखत असल्याने विरोधी उमेदवारांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे. कोतकरांचा दांडगा अनुभव आणि जुना जनसंपर्क पाहता, आगामी काही दिवसांत केडगावच्या राजकारणात मोठे फेरबदल पाहायला मिळू शकतात.

एकीकडे महायुती, दुसरीकडे महाविकास आघाडी आणि तिसरीकडे कोतकरांचे समर्थक असा त्रिकोणी संघर्ष प्रभाग १६ आणि १७ मध्ये अधिक तीव्र झाला आहे. भानुदास कोतकर यांच्या सक्रियतेने मतदानाची टक्केवारी आणि मतदारांचा कौल कोणाकडे झुकणार, याकडे संपूर्ण शहराचे आणि जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# ६ ते १३ दरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

६.१.२०२६ ते १३.१.२०२६ या कालावधीत शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर सभागृह येथे कै. चंद्रबाला गिरधरलाल गांधी यांच्या परिवारातर्फे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र धार्मिक सोहळ्यास भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे.

या प्रसंगी प्रसिद्ध कथाकार सुखदेवजी महाराज श्रीमद् भागवत महापुराणावर आधारित अत्यंत रोचक, भावनिक व अर्थपूर्ण प्रवचन देत आहेत. भागवत कथेच्या माध्यमातून भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा सखोल संदेश भाविकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.

कथा महोत्सवाच्या प्रारंभी समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी श्री दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर (मालाड), प्रकाशभाई (मालाड), राजेंद्र पांडेजी, रविभाई, नीताबेन योगेशभाई गांधी, स्मिता शरदकुमार मेहता, माया पंकजकुमार मेहता, आशा रवींद्र गांधी, सिद्धी विरल गांधी, जिनल अंकित गांधी, बिकल भाविन बुसा, तन्वी प्रतीक मेहता यांच्यासह गांधी परिवारातील सदस्य व असंख्य भाविक उपस्थित होते.

उपस्थित भाविकांनी भक्तीभावाने कथेचा आस्वाद घेतला असून संपूर्ण सभागृह भक्तीमय वातावरणाने भारावून गेले आहे. दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत भाविकांना कथेचा लाभ घेता येणार आहे.

कथेदरम्यान सुखदेवजी महाराजांनी सांगितले की, श्रीमद् भागवत ही केवळ कथा नसून जीवन कसे जगावे, दुर्गुणांचा त्याग कसा करावा आणि सत्य, भक्ती व नीतिमत्तेच्या मार्गावर कसे चालावे याचे मार्गदर्शन करते. त्यांनी गोकुळातील प्रसंगांचे उदाहरण देत, मोक्षप्राप्तीसाठी श्रीमद् भागवत हाच एकमेव उपाय असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "आजचे जीवन इंजिनच्या वेगाने धावत आहे. अशा काळात आपण सर्वांनी देवाशी जोडले जाणे आवश्यक आहे. प्रामाणिक कष्ट, सत्य मार्गाने कमाई आणि देवकृपेवर विश्वास ठेवणे हीच खरी संपत्ती आहे."

या कथेद्वारे भाविकांना श्रीकृष्णाच्या लीला, भक्ती, ज्ञान व वैराग्याचे महत्त्व समजावून सांगण्यात येत असून, भजन-कीर्तन, धार्मिक प्रवचन व प्रसाद वाटपाचेही आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमातून समाजात सद्गुण, संस्कृती आणि आध्यात्मिक चेतनेचा संदेश पसरवला जात आहे.

सर्व भाविकांनी आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दहशत मोडून काढण्यासाठी शिवसेना मैदानात

- अहिल्यानगर शहरात ५ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राष्ट्रवादी-भाजपची दहशत



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजप दहशत निर्माण करत आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) उमेदवारांना धमकावून, दमबाजीने, दहशत निर्माण करून उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावले. त्यातून राष्ट्रवादी व भाजपचे ५ उमेदवार बिनविरोध निवडून आले. ही दहशत मोडून काढण्यासाठीच शिवसेना मैदानात उतरली आहे.

शहरातील ताबेमारीच्या विरोधात व्यापाऱ्यांमध्ये असलेली खदखद मतदानातून व्यक्त होईल, असा दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहर प्रमुख सचिन जाधव यांनी पत्रकार परिषदेत केला.

शिवसेनेने १० उमेदवार पुरस्कृत केले आहेत. त्यामध्ये अश्विनी विलास सांगळे (१ क), उषा मंगेश भिंगारदिवे (२ क), संदीप यादव (२ डॉ), अशोक शामराव दहिफळे (५ ब), धनश्री सागर साठे (५ क), अमित दत्तात्रय खामकर (६ अ), मंगला गोरख धस (१६ अ), हर्षवर्धन कोतकर (१६ ड), गौरी गणेश ननावरे (१७ ब) दत्तात्रय खैरे (१७ डॉ) यांचा समावेश आहे.

याविषयी आयोजित पत्रकार परिषदेत अनिल शिंदे व सचिन जाधव बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक संभाजी कदम, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख स्वाती जाधव तसेच पुरस्कृत उमेदवार उपस्थित होते. त्यामुळे शिवसेनेचे एकूण ४९ उमेदवार रिंगणात आहेत.आपण काही दिवसांपूर्वी लावलेला प्रचाराचा फलक काढून घ्यावा म्हणूनही जाहिरात संस्थेला धमकावण्यात आल्याची तक्रार अनिल शिंदे यांनी केली.

शिवसेनेचे दिवंगत नेते अनिल राठोड यांनी नगर शहरातील दहशतीच्या विरोधात आवाज उठवला. तो आवाज कोणाविरुद्ध होता, हे नगर शहरातील नागरिकांना माहिती आहे. तेच लोक आजही दहशत निर्माण करत आहेत. प्रशासनाने अशा लोकांना हद्दपार करून शहरात शांतता ठेवावी, अशीही मागणी शिवसेनेने केली.

# महाविकास आघाडीचा प्रचार ढोल- ताशा व तुतारीच्या गर्जनेत सुरू

- प्रभाग ७ मध्ये महाविकास आघाडीची प्रचार रॅली
- शहरात केवळ विकासाच्या वल्गना -अभिषेक कळमकर



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचाराच्या मैदानात सक्रिय झाले असून, शहरातील विविध प्रभागांतून प्रचाराला जोरदार सुरुवात करण्यात आली आहे. सावेडी परिसरात ढोल-ताशांचा गजर, तुतारीच्या गर्जनेत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार उत्साहात सुरू झाला. सावेडी गावठाण येथील पवनसुत हनुमान मंदिरात नारळ वाढवून प्रभाग क्रमांक ०७ मधील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार महेश सखाराम शेळके (अ), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या प्रतिभा अक्षय भगत (क) व योगेश बाबासाहेब सुडके (ड) यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीदरम्यान उमेदवारांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठी-भेटी घेतल्या. नागरिकांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविकास आघाडीला वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून आले. प्रचारात कार्यकर्ते, समर्थक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर तसेच माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी विशेष उपस्थिती लावत मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, "शहरात केवळ विकासाच्या वल्गना केल्या जात आहेत; मात्र प्रत्यक्षात नागरिकांना हा विकास कुठेच दिसत नाही. सत्ताधारी नगरसेवकांनी सर्वांगिण विकास व जनसेवेला प्राधान्य देणे गरजेचे आहे. निवडणूक आली की विकासकामांचा गाजावाजा केला जातो."ते पुढे म्हणाले, "या प्रभागात अजूनही अनेक भाग अंधारात आहेत, पथदिव्यांचा अभाव आहे. पाणीटंचाई ही गंभीर समस्या असून, फेज-2 पाणीपुरवठा योजना १२ वर्षे उलटूनही कोट्यवधी रुपये खर्च करूनही पूर्णत्वास गेलेली नाही. शहरात मोकाट कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. सत्ता असूनही विकास झाला नाही, याबाबत नागरिकांमध्ये तीव्र भावना आहे."

# मतदार जनजागृतीसाठी "स्वीप धुरंधर" पुरस्काराचे आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावावा, तसेच मतदानाची टक्केवारी वाढून मतदारांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे यांच्या संकल्पनेतून मनपा स्वीप समितीच्या वतीने "स्वीप धुरंधर" पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी व्यक्ती, संस्था, विविध कार्यालये आणि शाळा/महाविद्यालये यांना प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन स्वीप समितीने केले आहे.

# भव्य स्वामीनारायण महामंत्र धुन कार्यक्रम संपन्न!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जय भगवान सभागृह येथे श्री हरी जयंती व पवित्र धनुर्मासाच्या निमित्ताने श्री धनश्याम महाराज सेवक मंडळ यांच्या वतीने भव्य स्वामीनारायण महामंत्र धुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या भक्तीमय कार्यक्रमास समाजातील विविध स्तरांतील भाविकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती लावली.


या वेळी समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, श्री अरविंदभाई ठक्कर, श्री खिमजीभाई ठक्कर, कनय्याभाई ठक्कर, श्री हरिभाई ठक्कर, श्री रामभाई ठक्कर, प्रविणभाई ठक्कर, श्री चंदुभाई ठक्कर, श्री भाई लालभाई ठक्कर, बाबूलाल जेतशी ठक्कर, श्री जयसुखभाई ठक्कर, श्री घनश्यामभाई ठक्कर, श्री आशिष ठक्कर यांच्यासह असंख्य भाविकांनी सहभाग घेत स्वामीनारायण महामंत्राचा सामूहिक जप केला.

धनुर्मासाच्या पवित्र कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आध्यात्मिक जागरूकता वाढवणे व समाजात सकारात्मक मूल्यांची रुजवणूक करणे हा होता. कार्यक्रमादरम्यान संतांचे आशीर्वाद, भजन-कीर्तन तसेच प्रसाद वाटप करण्यात आले. यामुळे संपूर्ण सभागृह भक्तीमय व आनंदी वातावरणाने भारावून गेले.

परमपूज्य श्री गुरुजी शास्त्री स्वामी भूषणदासजी यांच्या दिव्य आशीर्वाद व पवित्र उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष आध्यात्मिक उंची लाभली. त्यांच्या प्रेरणेमुळे भक्तांमध्ये उत्साह, श्रद्धा व आध्यात्मिक आनंद निर्माण झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिलेल्या सर्व भक्तगण व सेवकांचे श्री धनश्याम महाराज सेवक मंडळ यांच्या आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

# सारडा महाविद्यालयात गीत गायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त आयोजित गीत गायन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनीही गीत गायन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा,चित्रपटातील जुने व नवीन गाणे यांची मैफिल रंगली. गीत गायन स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी स्नेहसंमेलनाच्या कार्याध्यक्ष प्रा.अपर्णा शेवाळ,

गीत गायन समितीचे प्रा.योगेश तोवर,प्रा.ओंकार भिंगारदिवे, प्रा. मंगेश भुते,स्पर्धेचे परीक्षक प्रा. श्रेया घोरपडे,प्रा.ऋतुजा पाठक,प्रा. गीता देशमुख आदी उपस्थित होते. डॉ.माहेश्वरी गावित म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कला अवगत करणे आवश्यक आहे.संगीत या कलेमुळे मनोरंजन होतेच त्याचबरोबर जीवन आनंदमय राहते.संगीत या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना करिअर घडविण्यासाठी चांगली संधी आहे.

# मित्र-मैत्रिणींचा ३० वर्षांनंतर रंगला स्नेह मेळावा

## कोळगाव विद्यालयाला संगणक संचाची भेट




**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सन १९८९ ते १९९४ या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तब्बल ३० वर्षांनंतर मित्र-मैत्रिणी एकत्र आल्याने हा मेळावा भावनिक क्षणांनी भारलेला ठरला.

शालेय जीवनात जुळलेले ऋणानुबंध काळाच्या ओघात नकळत दुरावतात. अभ्यास, खेळ आणि सहवासात घडलेले नाते भाऊ-बहिणीसारखे घट्ट होत जाते; मात्र शाळा सुटल्यानंतर प्रत्येकजण आपल्या आयुष्यात गुंतून जातो. पुन्हा भेटण्याच्या आणाभाका घेतल्या जात असल्या तरी त्या प्रत्यक्षात येत नाहीत. मात्र पुन्हा एकदा लहान व्हावे, जुन्या आठवणींना उजाळा द्यावा, हीच ओढ या स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने पूर्ण झाली.

माजी विद्यार्थी शिवसेना श्रीगोंदा उपतालुकाप्रमुख आण्णासाहेब जगताप, अंबादास वाळके व शिला मिसाळ यांनी मित्र-मैत्रिणींना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला. गेल्या सहा वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले. अनेक अडचणींवर मात करत सर्वांशी संपर्क साधून हा मेळावा यशस्वी करण्यात आला. एकमेकांना पाहताच डोळ्यांत पाणी, तर ओठांवर हास्य उमटत होते. न बोलता देखील परस्परांच्या भावना समजून घेतल्या जात होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत काटे यांनी केले. अध्यक्षस्थानी माजी सैनिक मेजर शहाजी नलगे होते. यावेळी रामदास जठार, शंकरराव कदम, नानासाहेब साबळे, पारखे सर, अशोकराव पंडित, पोपटराव खेतमाळीस व लोकरे मॅडम हे सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. शिक्षकांनीही आपल्या आठवणी व भावना व्यक्त केल्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाजी हिरडे, शिक्षक व माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख प्रशांत खामकर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच मेजर अंकुश लाटे, नंदा लगड, शिवाजी ढोरजकर, वैशाली नलगे, सिंधू रायकर, सुनिता साके, मंदाकिनी बारगुजे, मनोहर मेटे, अरुणा हराळ, संतोष नलगे, गोवर्धन दारकुंडे, सुनिता खामकर, नंदा काटे, सुरेखा लगड, बिजल धस, अशोक धस, मधुकर लगड, शिवाजी भोसले, चंद्रकांत वाणी, सोमनाथ लगड, विद्या नलगे, पूजा वाणी, कांचन उजगरे, वनिता मानकर, किरण लाटे, दत्ता पवार, सोनबा बांदल, दत्तात्रय मुंडफण, संतोष लगड, मुक्ताजी गायकवाड, संजय बारगुजे आदी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या मेळाव्यात कोणी यशस्वी व्यावसायिक, कोणी वरिष्ठ व्यवस्थापक, कोणी शिक्षक, राजकीय पदाधिकारी, शेतकरी, पत्रकार तसेच गृहिणी सहभागी झाल्या होत्या. वयाचा विसर पडून सर्वजण हास्यविनोदात रमले होते. एकूण ६३ माजी विद्यार्थी या मेळाव्यास उपस्थित होते.

या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने विद्यालयाला सुमारे ५० हजार रुपये किमतीचा संगणक संच भेट देण्यात आला. भविष्यात शाळेच्या विकासासाठी हातभार लावणे, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे व वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन करण्याचा संकल्पही करण्यात आला. यावेळी शिक्षक माऊली गलांडे व शेलार मामा उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आण्णासाहेब जगताप व शिला मिसाळ यांनी केले, तर उपस्थितांचे आभार लालासाहेब पानसरे यांनी मानले.